**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक १८.०७.२०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.**

मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ४७ वी बैठक बुधवार दिनांक १८.०७.२०१८ रोजी दुपारी ३.०० वा. उद्यम हॉल, १ ला मजला, उद्योग भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४०००१ येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर | मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण |
| २. | श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ |
| ३. | श्री. एन. के. पोयाम | मा. कामगार आयुक्त (शासकीय प्रतिनिधी) |
| ४. | श्री. शशांक साठे | मा. उपसचिव -कामगार (शासकीय प्रतिनिधी) |
| ५. | श्रीमती वेदा आगटे | मा. मालक प्रतिनिधी |
| ६. | श्री. श्रीपाद कुटासकर | मा. कामगार प्रतिनिधी |
| ७. | श्री. विजय देवरुखकर | मा. कामगार प्रतिनिधी |
| ८. | श्री. अशोक भुताड | मा. कामगार प्रतिनिधी |
| ९ | श्री. श्री. चु. श्रीरंगम् | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री महोदय, मा. अध्यक्ष, मंडळ सदस्य व सर्व उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संच व मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी मंजूरी दिलेल्या दिनांक २२.०५.२०१८ रोजीच्या मंडळाच्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत सर्व उपस्थित सदस्यांना वाटप करण्यात आली.

तद्नंतर विषयसुचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

# बैठकीचे इतिवृतांत

**विषय क्र. १: मागील बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे.**

मंडळाच्या दिनांक २२.०५.२०१८ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्तांत मंडळ सचिव यांनी वाचुन दाखविले व सदर इतिवृत्तांतील विषय क्र.१५ व आयत्यावेळचा विषय क्र.१६ (१) बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती सदर दोन विषयाच्या ठरावास मान्यता देण्यात आली. सदर इतिवृत्तांतातील अन्य विषयांच्या ठरावात काही बदल करावयाचे असल्यास तसे सुचवावे त्यासह इतिवृत्तांत कायम करणे प्रस्तावित आहे, अशी विनंती मंडळ सचिव यांनी केली.

मंडळाच्या दिनांक २२.०५.२०१८ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. त्यानुसार सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव ४७(१)/२०१८: मंडळाच्या दिनांक २२.०५.२०१८ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र.०२: अटल विश्वकर्मा सन्मान योजनेअंतर्गत विशेष नोंदणी अभियान टप्पा-२ च्या प्रगतीचा अहवाल मंडळास सादर करणे व अटल विश्वकर्मा सन्मान योजनेला स्वतंत्र योजना स्वरुपात मंजूरीबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मंडळाच्या बैठकीत बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी प्रथम टप्प्यात मुंबई (MMR क्षेत्र), पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या सहा ठिकाणी माहे फेब्रु / मार्च २०१८ या कालावधीत एक महिन्याचे विशेष नोंदणी अभियान राबविण्यात यावे. सदर अभियानाकरीता त्या त्या विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सेवा घेण्यात याव्यात. सदर अभियानाची प्रसार, प्रसिद्धी करण्यात यावी असा ठराव पारित करण्यात आला.

मंडळाने पारित केलेल्या उपरोक्त ठरावानुसार राज्यातील ०६ ठिकाणी राबविण्यात आलेल्या अटल विश्वकर्मा सन्मान योजना- विशेष नोंदणी अभियानामध्ये दि.२३.०२.२०१८ ते १०.०४.२०१८ पर्यंत २,२४,५७७ बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात आली.

अटल विश्वकर्मा सन्मान योजनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या विशेष नोंदणी अभियानास स्कॉच अवॉर्ड मिळणेबाबतचा प्रस्ताव संबंधित संस्थेस सादर करण्यात आला होता. सदर संस्थेकडून महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची **"ऑर्डर ऑफ मेरिट"** अवॉर्ड करीता निवड करण्यात आली व दि.२२.०६.२०१८ रोजी नवी दिल्ली येथे सदर अवॉर्ड मंडळाचे सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आला.

मंडळाच्या दि.२२.०५.२०१८ रोजीच्या बैठकीत मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी अटल विश्वकर्मा योजनेअंतर्गत विशेष नोंदणी अभियान इतर जिल्हयात राबविण्यापूर्वी क्रिडाई सदस्यांची बैठक आयोजित करावी तसेच सर्व बिल्डर्सना मंडळाच्या योजना, कामगारांच्या नोंदणीचे फायदे याची माहिती देण्यात यावी, असे सूचित केले व सदरचे विशेष नोंदणी अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये प्रत्येक विभागातील ०२ जिल्हयात राबविण्याबाबत सूचित करण्यात आले. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: अटल विश्वकर्मा सन्मान योजनेअंतर्गत दिनांक २३.०२.२०१८ ते १०.०४.२०१८ या कालावधीत राबविण्यात आलेल्या विशेष नोंदणी अभियानाबाबतचा अहवाल मंडळास सादर करण्यात आला. सदर अहवालाची मंडळ सदस्यांनी नोंद घेतली, तसेच दुसऱ्या टप्प्यामध्ये प्रत्येक विभागातील दोन जिल्हयांची (एकूण १२ जिल्हे) निवड करून त्या जिल्हयात नोंदणी अभियान राबविण्याबाबत कार्यप्रणाली तयार करून नोंदणी अभियान राबविण्यात यावे. सदर अभियान राबविण्यासाठी क्रीडाई, अनुलोम संस्था, बांधकाम कामगार संघटना व या क्षेत्रातील स्वयंसेवी संस्थांची मदत घेवून शहरी व**

ग्रामीण भागातील जास्तीत जास्त बांधकाम कामगारांची नोंदणी मंडळाकडे करण्यात यावी. सदर अभियानात बांधकाम कामगारांच्या नोंदणीशिवाय बांधकाम कामगारांच्या नोदंणीचे नुतणीकरण, प्रलंबित लाभाचे अर्ज निकाली काढणे व नवीन लाभाचे अर्ज स्विकारणेबाबतही कार्यवाही करण्यात यावी. सदर अभियानाकरीता आवश्यक साहित्य, मोबाईल व्हॅन व अतिरिक्त मनुष्यबळाच्या पुरवठयाकरीता मंडळ व शासनाच्या मान्यतेने यापूर्वीच्या अभियानाकरीता नियुक्त करण्यात आलेल्या मे. अँगल ॲडव्हटायझिंग, पुणे या संस्थेची नियुक्ती पुर्वी मंजूर करण्यात आलेल्या दर, अटी व शर्तीनुसार करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

उक्त ठरावास अनुसरून मा. प्रधान सचिव, कामगार विभाग यांच्या अध्यक्षतेखाली व मा. कामगार आयुक्त यांच्या उपस्थितीत दि.०६.०६.२०१८ रोजी संपन्न कार्यालय प्रमुखांच्या आढावा बैठकीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत अनोंदीत बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाकरीता माहे ०२ जुलै २०१८ ते ३१ जुलै २०१८ (पूर्वतयारी दि.२५ जून ते ३० जून) या कालावधीत अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत राज्यातील १२ जिल्हयात विशेष नोंदणी अभियान राबविणेबाबत निर्णय घेण्यात आला व त्यानुसार अभियानाची रूपरेषा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे.

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १. | विशेष नोंदणी अभियानाची पूर्वतयारी | दि.२५ जून २०१८ ते दि. ३० जून २०१८ |
| २. | विशेष नोंदणी अभियान कालावधी | ०२ जुलै २०१८ ते ३१ जुलै २०१८ |
| ३. | अभियानाचे उददीष्ट | १.अनोंदीत बांधकाम कामगारांची नोंदणी करणे.<br>२. नोंदीत बांधकाम कामगारांचे नुतनीकरण करणे.<br>३. मे २०१८ पूर्वीचे सर्व प्रलंबित लाभाचे अर्ज निकाली काढणे.<br>४. लाभाचे अर्ज स्विकारणे. |
| ४. | अभियान नियंत्रण अधिकारी | संबंधित विभागाचे अप्पर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त/सहाय्यक कामगार आयुक्त |
| ५. | अभियान प्रमुख | संबंधित जिल्हा कार्यालय प्रमुख |

| | | |
|---|---|---|
| ६. | नोंदणी केंद्र | प्रति दिन १०० बांधकाम कामागरांची नोंदणी विचारात घेऊन लक्षांकानुसार केंद्र संख्या निश्चित करण्यात यावी. |

सदर विशेष नोंदणी अभियानाकरीता मा. प्रधान सचिव, कामगार यांच्या सूचनेनुसार खालीलप्रमाणे जिल्हानिहाय लक्षांक निर्धारित करण्यात आले आहे.

| **विभाग** | **अ. क्र.** | जिल्हे | **अभियान प्रमुख** | **नोंदणीचे लक्षांक** |
|---|---|---|---|---|
| मुंबई, (कोकण विभाग) | १. | रत्नागिरी | सहाय्यक कामगार आयुक्त | २०,००० |
| पुणे विभाग | २. | सोलापूर | सहाय्यक कामगार आयुक्त | २५,००० |
| | ३. | कोल्हापूर | सहाय्यक कामगार आयुक्त | २५,००० |
| नाशिक विभाग | ४. | अहमदनगर | सहाय्यक कामगार आयुक्त | २५,००० |
| | ५. | धुळे/ नंदूरबार | सरकारी कामगार अधिकारी | २०,००० |
| औरंगाबाद विभाग | ६. | नांदेड | सहाय्यक कामगार आयुक्त | २०,००० |
| | ७. | परभणी | सरकारी कामगार अधिकारी | २०,००० |
| | ८. | हिंगोली | सरकारी कामगार अधिकारी | २०,००० |
| नागपूर विभाग | ९. | चंद्रपूर | सहाय्यक कामगार आयुक्त | २५,००० |
| | १०. | गोंदीया | सहाय्यक कामगार आयुक्त | २०,००० |
| अमरावती विभाग | ११. | यवतमाळ | सरकारी कामगार अधिकारी | २०,००० |
| | १२. | वाशिम | सरकारी कामगार अधिकारी | २०,००० |
| **एकूण** | | | | **२,६०,०००** |

त्यानुसार १२ जिल्हात राबविण्यात येत असलेल्या जिल्हा कार्यालयांना विशेष नोंदणी अभियानाकरीता आवश्यक मनुष्यबळ, मोबाईल व्हॅन इतर सामुग्रीबाबत त्यांची मागणी सादर करण्याबाबत कळविण्यात आलले होते. त्यानुसार सदर जिल्हयांनी त्यांना आवश्यक असलेली सामुग्रीबाबतची मागणी मंडळास सादर केलेली होती. तसेच मंडळाच्या ठरावानुसार मागील अभियानाकरीता नेमण्यात आलेली मे. अँगल ॲडव्हर्टायझिंग प्रा. लि ही संस्था व बाबनिहाय मंजूर दरानुसार प्रस्तावित अभियानाकरीता जिल्हा कार्यालयांनी नोंदविलल्या मागणीनुसार रू.४.०० कोटी (अधिक वस्तू सेवाकरासह) एवढया अंदाजित खर्चाचा प्रस्ताव शासन मान्यतेस दि.२१.०६.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावास शासनाने

दि.०२.०७.२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार मे. अँगल अॅडव्हर्टायझिंग प्रा. लि या संस्थेस पुरवठा आदेश देण्यात आले आहेत.

मा. मंत्री महोदय (कामगार) यांच्या हस्ते अटल विश्वकर्मा सन्मान योजना विशेष नोंदणी अभियानाचा टप्पा-०२ चे ई- शुभारंभ दि.०४.०७.२०१८ रोजी नागपूर येथून करण्यात आलेले आहे. सदर ई- शुभारंभ कार्यक्रमास मा. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री, उर्जा विभाग, राज्य उत्पादन शुल्क तथा पालक मंत्री, नागपूर, मा. श्री.राजकुमार बडोले, मंत्री सामाजिक न्याय विभाग, मंडळाचे मा.अध्यक्ष, मा.प्रधान सचिव, मा.कामगार आयुक्त, मंडळ सदस्य व अधिकारी उपस्थित होते.अभियानात समाविष्ट १२ जिल्हयांचे लोकप्रतिनिधी, अनुलोम संस्थेचे प्रतिनिधी, कामगार संस्थेचे प्रतिनिधी व अधिकारी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारा उपस्थित होते.

विशेष नोंदणी अभियान टप्पा ०२ मध्ये दि.०४.०७.२०१८ ते १६.०७.२०१८ या कालावधीत १२ जिल्हयामध्ये नोंदीत झालेल्या बांधकाम कामगारांचा जिल्हा निहाय तपशील खालीलप्रमाणे:

| **अ.क्र.** | **जिल्हे** | **नोंदणीचे लक्षांक** | **दि. ०४.०७.२०१८ ते दि.१६.०७.२०१८पर्यंत नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या** |
|---|---|---|---|
| १. | **रत्नागिरी** | २०,००० | **२५७** |
| २. | सोलापूर | २५,००० | ३५१७ |
| ३. | कोल्हापूर | २५,००० | १४१९ |
| ४. | अहमदनगर | २५,००० | १८५७ |
| ५. | धुळे/ नंदूरबार | २०,००० | ५७२ |
| ६. | नांदेड | २०,००० | ३५२६ |
| ७. | परभणी | २०,००० | २३०६ |
| ८. | हिंगोली | २०,००० | २९६२ |
| ९. | चंद्रपूर | २५,००० | ८२६ |
| १०. | गोंदीया | २०,००० | ६८८८ |
| ११. | यवतमाळ | २०,००० | ३८५९ |
| १२. | वाशिम | २०,००० | ४७२ |
| | **एकूण** | **२,६०,०००** | **२८,४६१** |

**अटल विश्वकर्मा सन्मान योजना मंजूरीबाबत: -**

मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांनी दि.२३.०२.२०१८ रोजी विशेष नोंदणी अभियानाच्या पहिल्या टप्प्याच्या ई-शुभारंभ प्रसंगी सदर योजनेस **अटल विश्वकर्मा सन्मान योजना** असे नाव संबोधित केले होते. मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत विशेष नोंदणी अभियानाचा टप्पा ०१ पूर्ण झालेला असून टप्पा ०२ प्रगतीपथावर आहे. सदर योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात ०६ जिल्हयात नोंदणी अभियान राबविण्यात आले होते तर दुसऱ्या टप्प्यामध्ये १२ जिल्हयांचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर अभियान राबविण्यासाठी आवश्यक साहित्य, मोबाईल व्हॅन व अतिरिक्त मनुष्यबळाच्या पुरवठा मंडळ व शासन मान्यतेने नियुक्त केलेल्या संस्थेमार्फत करण्यात येत आहे. सदर अभियानावर पहिल्या टप्प्याकरीता झालेला खर्च, दुसऱ्या टप्प्यातील अपेक्षित खर्च व भविष्यात राबवावयाचा अन्य टप्प्याच्या खर्चाची व्याप्ती विचारात घेता सदर खर्च प्रशाकीय बाबीखाली न नोंदविता स्वतंत्र योजना मंजूर करावी व विशेष नोंदणी अभियानाचा खर्च या योजनेखाली खर्ची टाकण्यात यावा असे प्रस्तावित आहे. अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत विशेष नोंदणी अभियान राबविण्यास व सदर अभियानावरील खर्च अटल विश्वकर्मा सन्मान ही स्वतंत्र योजना मंजूर करून त्या योजनेवर खर्ची टाकण्यास मंडळाच्या मान्यतेस प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

अटल विश्वकर्मा सन्मान योजनेअंतर्गत विशेष नोंदणी अभियान टप्पा- २ चा अहवाल मंडळास सादर करणे व **'अटल विश्वकर्मा सन्मान योजना'** या योजनेस स्वतंत्र योजना स्वरूपात मंजूरी देणेबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव क्र. ४७(२)/२०१८: अटल विश्वकर्मा सन्मान योजनेअंतर्गत विशेष नोंदणी अभियान टप्पा-२, च्या प्रगतीचा अहवाल मंडळास सादर करण्यात आला. सदर अहवालाची मंडळाकडून नोंद घेण्यात आली. मे. अँगल ॲडव्हर्टायझिंग प्रा. लि या संस्थेच्या नियुक्तीस बाबनिहाय मंजूर दरानुसार प्रस्तावित अभियानाकरीता जिल्हा कार्यालयांनी नोंदविलल्या मागणीनुसार रू.५.०० कोटी (अधिक वस्तू सेवाकरासह) एवढया अंदाजित खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच, अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत विशेष नोंदणी अभियान राबविण्यास व सदर अभियानावरील खर्च अटल विश्वकर्मा सन्मान योजनेअंतर्गत खर्ची टाकण्यास व सदर योजना स्वतंत्र योजना स्वरूपात राबविण्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसा प्रस्ताव शासन**

मान्यतेस सादर करण्यात यावा व शासनमान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०३: केंद्र शासनाच्या पंतप्रधान जीवन वीमा योजना व पंतप्रधान सुरक्षा विमा योजनाया योजनांचे आम आदमी विमा योजनेत रुपांतरीत (Convergence) करून राबविणे व सदर योजनेचा जिवित नोंदित बांधकाम कामगारांकरीताचा विमा हफ्ता मंडळामार्फत अदा करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, पंतप्रधान जीवन विमा योजना व पंतप्रधान सुरक्षा विमा योजना या दोन्ही योजना बांधकाम कामगारांना राबविण्याचा प्रस्ताव राज्य शासनास दि.०५.०५.२०१५ रोजी सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास शासनाची दि.२७.०६.२०१६ रोजी मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्यानुसार सर्व जिल्हा कार्यालयांना दि.२०.०३.२०१७ रोजीच्या पत्रान्वये योजनेच्या अंमलबजावणी करण्याबाबत कळविण्यात आले होते.

**पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजनेचा लाभाचा तपशील खालील प्रमाणे**

१. पात्रता :- १८ ते ५० वयोमर्यादा असलेले सहभागी बॅकामधील बचत खातेधारक
२. विमा कालावधी :- वार्षिक
३. हप्ता :- प्रती कामगार प्रति वर्षरू.३३०/-
४. लाभ :- कोणत्याही कारणाने मृत्यू झाल्यास रू.२ लाखाचे विमा संरक्षण
५. शुल्क आकारणी :- बचत खात्यामधून ॲटो-डेबीट पध्दतीने

**पंतप्रधान सुरक्षा विमा योजनेचा लाभाचा तपशील खालीप्रमाणे**

१. पात्रता :- १८ ते ७० वयोमर्यादा असलेले सहभागी बॅकामधील बचत खातेधारक
२. विमा कालावधी :- वार्षिक
३. हप्ता :- प्रती कामगार प्रति वर्षरू.१२/-
४. लाभ :- अपघाती मृत्यू झाल्यास रू.२ लाखाचे विमा संरक्षण, दोन्ही डोळे अथवा दोन्ही पाय अथवा दोन्ही हात पूर्ण पणे गमावल्यास अथवा एक डोळा व एक हात अथवा एक डोळा व एक पाय पूर्णपणे गमावल्यास रू.२ लाखाचे विमा संरक्षण, एक डोळा अथवा एक हात अथवा एक पाय पूर्णपणे गमावल्यास रू. १ लाखाचे विमा संरक्षण
५. शुल्क आकारणी :- बचत खात्यामधून ॲटो-डेबीट पध्दतीने

मंडळामार्फत माहे मार्च २०१७ पासून उपरोक्त दोन्ही योजना नोंदीत बांधकाम कामगारांकरीता लागू करण्यात आलेल्या आहेत. सदर योजनेतील अटी शर्ती नुसार नोंदीत बांधकाम कामगाराने उपरोक्त योजनेचे सदस्यत्व स्विकरून योजनेचे शुल्क (विमा हफ्ता) प्रथम

स्वतःच्या बचत खात्यामधून LIC या नोडल एजन्सीकडे जमा करणे अपेक्षित होते. नोंदीत बांधकाम कामगाराने अदा केलेल्या रक्कमेच्या प्रतिपूर्तीसाठी मंडळाकडे मागणी नोंदविल्यानंतर मंडळ स्तरावरून त्याची प्रतिपूर्ती करणे अपेक्षित होते. तथापि, मागील ०१ वर्षापेक्षा जास्त कालावधीत कोणत्याही नोंदीत बांधकाम कामगाराने सदर योजनेचे सदस्यत्व स्विकारूनशुल्क (विमा हफ्ता) प्रतिपूर्तीची मागणी मंडळाकडे नोंदविलेली नाही. परिणामी , सदर योजनेचा लाभ नोंदीत बांधकाम कामगारांनी घेतल्याचे दिसून येत नाही.

**आम आदमी विमा योजना रुपांतरीत (Convergence) :-**

केंद्र शासनाच्या दि. १३.११.२०१७ रोजीच्या आदेशान्वये उक्त पंतप्रधान जीवन विमा योजना व पंतप्रधान सुरक्षा विमा योजना या योजनांचे एकत्रिकरण (Convergence) आम आदमी विमा योजनेमध्ये करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहे. सदर आदेशासोबतच्या प्रपत्र-०२ मध्ये एकूण ४८ व्यवसायाची यादी देण्यात आलेली असून त्यापैकी अनु. क्र. ३८ व बांधकाम कामगारांचा सदर यादीत समाविष्ट करण्यात आलेला आहे. सबब, सदर योजना आदेशाातील डाटा फॉर्मेट (प्रपत्र- ०१) मध्ये बांधकाम कामगारांची माहिती LIC कार्यालयास सादर करून नोंदीत बांधकाम कामगारांना सदर योजनचे लाभ लागू करता येईल.

केंद्र शासनाच्या दि.१३.११.२०१७ रोजीच्या पत्रान्वये राबवावयाच्या आम आदमी विमा योजनेच्या अटी शर्ती व विमा रक्कमेबाबतचा तपशील खालीलप्रमाणे

१. **योजनेचे लाभार्थी: -**

अ) वय वर्षे १८ ते ५० वयोगटातील कामगार या योजनेतील लाभार्थ्यांकरीता कॉनव्हर्जड आम आदमी विमा योजना लागू करण्यात आलेली आहे.

आ) बांधकाम कामगार दारिद्र्यरेषेखालील (BPL) असावा/ MABPL (Marginal Above BPL) असावा.

इ) तो कुटूंबातील कमवता व्यक्ती अथवा कुटूंबप्रमुख असावा.

**२.** प्रति कुटूंब विमा हप्ता :-

| | |
|---|---|
| Premium Share of Nodal Agency (MBOCWWB) | Rs. १७१/- |
| Premium Contribution from Social Security fund (LIC) | Rs. १७१/- |
| Total | Rs. ३४२/- |

३. योजनेचे लाभ:-

| अ.क्र. | योजनेचे लाभ | लाभाची रक्कम |
|---|---|---|
| १. | कोणत्याही कारणाने मृत्यू झाल्यास (नैसर्गिक मृत्यू झाल्यास) | रू. २ लक्ष |
| २. | दोन्ही डोळे अथवा दोन्ही पाय अथवा दोन्ही हात पूर्ण पणे गमावल्यास अथवा एक डोळा व एक हात अथवा एक डोळा व एक पाय पूर्णपणे गमावल्यास | रू. २ लक्ष |
| ३. | एक डोळा अथवा एक हात अथवा एक पाय पूर्णपणे गमावल्यास | रू. १लक्ष |
| ४. | अपघाती मृत्यू झाल्यास | रू. २ लक्ष |
| ५. | लाभार्थ्याच्या पाल्याच्या शिक्षणाकरीता शिक्षा सहयोग योजनेंतर्गत इयत्ता ०९ वी ते १२ किंवा आयटीआय कोर्स करीत असल्यास व दरवर्षी उत्तीर्ण होत असल्यास पाल्यास (जास्तीत जास्त दोन पाल्यांकरीता) | रू. १००/- (दरमहा) |

केंद्र शासनाच्या दि.१३.११.२०१७ च्या आदेशान्वये प्राप्त निर्देशानुसार वरीलप्रमाणे योजना राबविण्यासाठी मंडळाच्या मान्यतेस प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. मंडळाच्या मान्यतेअंती शासन मान्यता प्राप्त करून प्रस्तावित योजनेचे निकष व केंद्र शासनाचे दि.१३.११.२०१७ रोजीच्या आदेशासोबत प्रपत्र- ०१ (डाटा फॉर्मेट) मध्ये मंडळाकडील जिवीत नोंदीत बांधकाम कामगारांची यादी LIC या संस्थेस सादर करण्यात येईल तसेच LIC कार्यालयास विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र व अन्य आवश्यक माहिती सादर करून LIC कार्यालयाने पात्र ठरविलेल्या नोंदीत बांधकाम कामगारांकरीता प्रतिवर्ष प्रतिकामगार रू.१७१/- प्रमाणे वार्षिक विमा हप्त्याची रक्कम LIC कार्यालयाकडे वर्ग करण्यात येईल.

सद्यस्थितीत मंडळाकडे नोंदीत बांधकाम कामगाराचा बांधकामाच्या ठिकाणी अपघाती मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रू.५ लक्ष एवढे आर्थिक सहाय्य देण्यात येते. आम आदमी विमा योजना (Convergence) लागू केल्यास बांधकामाच्या ठिकाणी नोंदित बांधकाम कामगारांचा अपघाती मृत्यू झाल्यास बांधकाम कामगारांना उपरोक्त अनु. क्र. ०१ व ०४ येथील प्रत्येकी रू.२ लक्ष प्रमाणे एकूण रू. ४ लक्ष एवढे आर्थिक सहाय्य मिळेल. मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांना सदर दोन्ही योजना लागू करण्यात याव्यात किंवा कसे याबाबतही मंडळ बैठकीत विचार विनिमय व्हावा.

याविषयी चर्चेत सहभागी होताना मंडळ सदस्य श्री. कुटासकर यांनी मुद्दा उपस्थित केला की, बांधकाम कामगारांची माहिती ज्या नमुन्यात LIC कंपनीला द्यावयाची आहे त्या स्वरूपात

माहिती उपलब्ध आहे काय? जे नोंदीत बांधकाम कामगार सदस्य होतील त्यांची स्वंतत्र पॉलिसी राहील किंवा एकच पॉलिसी राहील याबाबत खुलासा करताना सचिवांनी स्पष्ट केले की, मंडळाने बांधकाम कामगारांच्या नोंदणीकरीता नवीन नमुना V मधील अर्ज तयार करून सर्व कार्यालयांना पाठविलेला आहे. सदर अर्जामध्ये LIC ला आवश्यक असलेली जवळपास सर्व माहिती उपलब्ध होईल. विशेष नोंदणी अभियान टप्पा ०१ मधील नोंदणीच्या अर्जाचे स्कॅनिंग व डेटा एंट्री जवळपास पूर्ण झालेले आहेत तो डेटा व दि.०४.०७.२०१८ पासून विशेष नोंदणी अभियान टप्पा-०२ चा डेटा LIC ला उपलब्ध करून देता येईल व जुन्या डेटामध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील. LIC ने प्राप्त माहितीनुसार पात्र ठरविलेल्या नोंदीत बांधकाम कामगारांकरीता एकच पॉलिसी क्रमांक देण्यात येईल. तथापि, त्या त्या जिल्हयातील बांधकाम कामगारांचे दावे LIC च्या क्षेत्रिय कार्यालयात निकाली काढण्याबाबत LIC ला विनंती करण्यात येईल. मंडळ सदस्य श्रीम. वेदा आगटे यांनी चर्चेत भाग घेताना विचारणा केलेली प्रस्तावित आम आदमी विमा योजनेचे सदस्य झालेल्या बांधकाम कामगारांना प्रस्तावित लाभाशिवाय मंडळाकडील कामाच्या ठिकाणी मृत्यू झाल्यास मिळणारे रू.५ लक्ष चे लाभ सुध्दा मिळेल काय यावर मंडळ सचिवांनी स्पष्ट केले की, याबाबतही मंडळाच्या बैठकीत निर्णय घेणे प्रस्तावित आहे. सविस्तर चर्चेअंती मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी सदर विषय स्थगित ठेवण्यात यावा व मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करण्यात यावी असे निदेश दिले. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव क्र. ४७(३)/२०१८: केंद्र शासनाच्या पंतप्रधान जीवन वीमा योजना व पंतप्रधान सुरक्षा विमा योजनाया योजनांचे आम आदमी विमा योजनेत रुपांतरीत(Convergence) करून राबविणे व सदर योजनेचा जिवित नोंदित बांधकाम कामगारांकरीताचा विमा हफ्ता मंडळामार्फत अदा करणेबाबतचा विषय तूर्तास स्थगित ठेवावा व मंडळाच्या आगामी बैठकीत सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र.०४: मंडळाकडे नोंदित बांधकाम कामगारांना मोबाईल टॉयलेट सुविधा पुरविण्याच्या RFP प्रारुपाचे सादरीकरण करणे बाबत.**

यावाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि.०३.०१.२०१८ रोजीच्या बैठकीत मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांकरीता मोबाईल टॉयलेट (Mobile Toilet) ची सुविधा उपलब्ध करून देणे चर्चा करण्यात आली. केंद्र शासनाच्या श्रम एवं रोजगार मंत्रालय, नवी दिल्ली यांचेमार्फत दि.११ जुलै २०१७ रोजीलेबर कम नाईट शेल्टर, मोबाईल टॉयलेट, मोबाईल क्रेश इ. सुविधा बांधकाम कामगारांना उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश प्राप्त झालेले आहेत.

बांधकाम कामगार कामानिमित्त सतत स्थलांतरीत होत असतात. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत झाल्यांनतर प्रत्यक्ष काम मिळेपर्यंत सदर बांधकाम कामगारांना राहणे, शौचालय, पाळणाघर इत्यादी अभावी मुलभूत सोयी सुविधेकरीता त्रास सहन करावा लागतो. बांधकाम कामगारांना लेबर कम नाईट शेल्टर, मोबाईल टॉयलेट, मोबाईल क्रेश अशा सोयी सुविधा मंडळामार्फत उपलब्ध करून देणेबाबत केंद्र शासनाचे निर्देश प्राप्त झाले आहे.

तसेच, केंद्र शासनाने त्यांच्या दि.०८.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार बांधकाम कामगारांना सामाजिक सुरक्षे संबधीत योजनांचा लाभ दिल्यानंतर उपलब्ध निधीमधून उपरोक्त सोयी सुविधावर खर्च करण्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे.

केंद्र शासनाच्या उपरोक्त निर्देशास अनुसरून मंडळाच्या दिंनाक ०३.०१.२०१८ रोजी सादर प्रस्तावावर सवस्तिर चर्चेअंती ठराव पारित करण्यात आला होता.

मंडळाच्या दि.०३.०१.२०१८ रोजीच्या ठरावानुसार व केंद्र शासनाच्या अटी व शर्तीच्या अनुषंगाने बांधकामाच्या साईटवर नोंदीत बांधकाम कामागरांकरीता मोबाईल टॉयलेटची योजना राबविण्याबाबत दिंनाक १४.०३.२०१८ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास शासन उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या पत्र क्र. इबांका-२०१८/प्र. क्र५०/काम-७ दि.०७.०६.२०१८अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

मंडळाचा ठराव व केंद्र शासनाने निर्देशित केलेल्या अटी शर्तीस अनुसरून सदर योजना राबवण्यिासाठी ई-निविदा पद्धतीने संस्था निवड करण्यासाठी मंडळाचे सल्लागार मे. केपीएमजी यांनी RFP च्या प्रारूपाचे सादरीकरण मंडळाच्या दि.२२.०५.२०१८ रोजीच्या बैठकीत केले होते. सदर सादरीकरणानंतर सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

**ठराव: राज्यातील ५० ते २५० बांधकाम कामगार काम करतात अशा बांधकामाच्या ठिकाणी व महानगरपालिका क्षेत्रात ज्या ठिकाणी बांधकाम कामगारांकरीता शेड उभारण्यात आलेअशा ठीकाणावर नोंदित बांधकाम कामगारांकरीता मोबाईल टॉयलेट (Mobile Toilet) ची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. प्रथमत: १००० मोबाईल टॉयलेट भाडेतत्वावर घेण्यात यावे व पुरवठादार संस्थेवर पुरवठा, कार्यान्वयन, देखभाल व दुरुस्ती व मनुष्यबळासह (Supply, Operation & Maintanance including Manpower Support) पुरवठयाची जबाबदारी असावी. कंत्राट कालावधीमध्ये मंडळाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी मंजूर केलेल्या बांधकामाच्या ठिकाणी मोबाईल टॉयलेटची ने-आण करण्याची जबाबदारी पुरवठादार संस्थेची राहिल. सदर माबाईल टॉयलेट सुरुवातीस प्रायोगिक तत्वावर १ वर्षाकरीता घेवून सदर संस्थेचे काम समाधानकारक असल्यास पुढील दोन वर्ष वाढविण्याची तरतुद निविदा अटी शर्तीमध्ये करण्यात यावी. मोबाईल टॉयलेटमध्ये २ सिट पुरुषांकरीता व १ सिट स्त्रीयांकरीता असावे. त्यांचा वापराचा कालावधी २ पाळयांमध्ये (Shift) (सकाळ व दुपार प्रत्येकी ८ तासांकरीता) आवश्यकतेनुसार करण्यात यावा. तसेच मोबाईल टॉयलेटचे निरिक्षण GPS Based प्रणालीद्वारे करण्यात यावे. सदर अटी शर्तीसह योजना मंजूरीचा व या क्षेत्रातील अनुभवी संस्थेची नेमणूक करण्यासाठी ई-निविदा पद्धतीने संस्था निश्चितीकरीतामंडळाचे e-Gov Consultant यांनी तयार कलेले RFP Document मंजूरीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा, शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

मंडळाच्या उपरोक्त ठरावानुसार सुधारित RFP चे प्रारूप मंडळाचे e-Gov सल्लागार मे. केपीएमजी यांनी तयार केले असून त्याचे सादरीकरण मंडळाच्या बैठकीत करण्यात आले सदर RFP च्या प्रारूपाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी निर्देश दिले की, सदर RFP च्या सादरीकरणाची प्रत सर्व मंडळ सदस्यांना पाठविण्यात यावी व मंडळ सदस्यांकडून प्राप्त सूचनेनुसार आवश्यक तो बदल करून सदर योजनेच्या ई-निविदेचे RFP प्रारूप मंडळाच्या आगामी बैठकीत मान्यतेस सादर करण्यात यावे. यास सर्व सदस्यांनी सहमती दर्शविली.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव क्र.४७(४)/२०१८: मंडळाकडे नोंदित बांधकाम कामगारांना मोबाईल टॉयलेट सुविधा पुरविण्याच्या RFP प्रारुपाच्या सादरीकरणाची प्रत सर्व मंडळ सदस्यांना**

पाठविण्यात यावी. मंडळ सदस्यांच्या प्राप्त अभिप्रायानुसार सुधारित RFP तयार करून मंडळाच्या आगामी बैठकीत सादर करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार |
| कल्याणकारी मंडळ, मुंबई | कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र.०५: नोंदित बांधकाम कामगारांसाठी नाक्याच्या ठिकाणी शेड उभारणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मंडळाच्या दि.२२.०५.२०१८ रोजीच्या बैठकीत नोंदीत बांधकाम कामगारांसाठी नाक्याच्या ठिकाणी शेड उभारणेबाबत विषय सादर करण्यात आला होता. बऱ्याच जिल्हयाच्या ठीकाणी नाका कामगार असतात. त्यांना नाक्याच्या ठिकाणी राहण्याची सोय नसते, पाण्याची सोयही नाक्याच्या ठिकाणी नसते. अशा नाका कामगारांसाठी नाक्याच्या ठिकाणी शेड उभारणे आवश्यक आहे. सदर शेड उभारताना त्यामध्ये कामगारांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय, शौचालय उपलब्ध करून दिले पाहिजे.

त्यावर मा. प्रधान सचिव (कामगार) यांनी असे मत व्यक्त केले की, सदर शेड महापालिकेच्या ठिकाणी उभारण्यात यावी. प्रत्येक जिल्हयाच्या कामगार उप आयुक्त, सहाय्यक कामगार आयुक्त, सरकारी कामगार अधिpकारी यांच्याकडून संबंधित जिल्हयांच्या नाक्याची माहिती घेण्यात यावी. तसेच महानगरपालिकेच्या शेड उभारण्यास योग्य अशा जागेची माहिती घेण्यात यावी व सदर योजना प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी राबविण्यात यावी. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला होता.

**ठराव क्र.४६(१६.३)/२०१८: मंडळाकडे नोंदित असणाऱ्या बांधकाम कामगारांपैकी महानगरपालिका/ नगरपालिका क्षेत्रात नाक्याच्या ठिकाणी जमा होतात अशा नाक्यावरील बांधकाम कामगारांसाठी महानगरपालिका / नगरपालिकेच्या जागेवर पिण्याच्या पाण्याची सोय, शौचालयाचा समावेश असलेले शेड उपलब्ध करून देण्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, संबंधित जिल्हयातील नाक्याची माहिती जिल्हा कार्यालयांकडून प्राप्त करावी तसेच संबंधित महानगरपालिकांना नाक्याच्या ठिकाणी शेड उभारण्यासाठी जागा व त्यासाठी आवश्यक तरतूदीचा प्रस्ताव मागविण्यात यावा. महानगरपालिकेकडून प्राप्त प्रस्तावानुसार बांधकाम कामगांरासाठी तात्पुरते शेड उभारण्यासाठी निधी मागणीचा प्रस्ताव महानगरपालिका/ नगरपालिकांकडून प्राप्त करून मंडळाच्या आगामी बैठकीत सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

मंडळाच्या उपरोक्त ठरावास अनुसरून नोंदीत बांधकाम कामगारांकरीता नाक्याच्या ठिकाणी शेड उभारण्यासाठी साधारणत: ५०/१००/२०० कामगारांकरीता पिण्याच्या पाण्याची सोय, शौचालय, बसण्याची व्यवस्था इ. सह शेडचे डिझाईन तयार करणे, अंदाजित खर्च व अनुषंगिक बाबींवरील कार्यवाहीकरीता मे. देवधर असोसिएटस या वास्तूविशारदकांना नियुक्त

करण्यात आली आहे मे. देवधर असोसिएटस यांनी तयार केलेल्या शेडचे डिझाईन्स मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात येत आहे. मंडळ सचिवांनी मे. देवधर असोसिएटस यांच्या प्रतिनिधींना सादरीकरणाची सूचना दिली त्यानुसार मे. देवधर असोसिएटस यांच्या प्रातिनिधीनी शेडच्या वेगवेगळया डिझाईन्सचे सादरीकरण केले व वेगवेळया डिझाईन्सकरीता आवश्यक जागा, अंदाजित खर्च इत्यादी बाबत मंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी निर्देश दिले की, सदर सादरीकरणाची प्रत सर्व मंडळ सदस्यांना पाठविण्यात यावी व मंडळ सदस्यांकडून प्राप्त सूचनेनुसार मे. देवधर असोसिएटस यांच्या प्रातिनिधीकडून आवश्यक तो बदल करून सदर योजनेसाठी सुधारित शेडच्या डिझाईन्सचे सादरीकरण तयार करून मंडळाच्या आगामी बैठकीत सादर करण्यात यावी. यास सर्व सदस्यांनी सहमती दर्शविली.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव क्र.४७(५)/२०१८: नोंदित बांधकाम कामगारांसाठी नाक्याच्या ठिकाणी शेड उभारणेबाबत, मंडळाच्या बैठकीत मे. देवधर असोसिएटस सादर केलेले सादरीकरणाची प्रत सर्व मंडळ सदस्यांना पाठवून त्यावर मंडळ सदस्यांच्या अभिप्रायानुसार मे. देवधर असोसिएटस यांच्या प्रातिनिधीकडून आवश्यक तो बदल करून सदर योजनेसाठी सुधारित शेडच्या डिझाईन्सचे सादरीकरण तयार करून मंडळाच्या आगामी बैठकीत सादर करण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र. ०६: मंडळाकडे नोंदित बांधकाम कामगारांच्या पाल्यांकरीता पाळणा घराची सुविधा उपलब्ध करून देणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मा. मंत्री महोदय कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन व माजी सैनिकांचे कल्याण यांच्या अध्यक्षतेखालील दि.१५.०५.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळातील कामगारांच्या पाल्यांसाठीमोबाईल डे-केअर युनिट सुरू करणेबाबत निर्देश दिले होते.

राज्यातील विविध बांधकामाच्या ठिकाणी काम करणा-या बांधकाम कामगार हे विविध राज्यातून स्थलांतरीत झालेले आहेत किंवा ग्रामीण भागामध्ये कामानिमित्त बांधकामाच्या ठिकाणी आलेले असतात. बांधकाम कामगारांना स्वत: ची घरे नसल्याने स्त्री व पुरूष कामगार यांच्या पाल्यास बांधकामाच्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात शेड तयार करून राहतात. स्त्री व पुरूष बांधकाम कामगार कामावर असताना त्यांच्या पाल्यांकरीता लक्ष देण्यास अन्य व्यक्ती उपलब्ध नसल्याने पाल्यांकडे दुर्लक्ष होते. बांधकाम कामगारांची मुले बांधकाम कामगारांच्या वेळोवेळीच्या स्थलांतरणांमुळे नियमित शालेय शिक्षण घेऊ शकत नाही, त्यांच्या वैयक्तिक स्वछतेकडेही पालक लक्ष देत नाही. परिणामी, सदर पाल्यांना विविध आजारांना सामोरे जावे लागते. बांधकाम कामाच्या ठिकाणी मोबाईल डे-केअर युनिट स्थापनकेल्यास बांधकाम कामगाराच्या पाल्यांसाठी उपयुक्त ठरेल या हेतूने मोबाईल डे-केअर युनिट स्थापन करणे प्रस्तावित आहे.

मोबाईल डे-केअर युनिट या योजनेचे स्वरूप खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आले होते.

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | योजनेचे लाभार्थी | जिवीत नोंदीत बांधकाम कामगारांचे पाल्य |
| २. | पाल्यांचा वयोगट | पाळणाघर- ० ते ०३ वर्षे<br>बालवाडी- ०३ ते ०६ वर्षे<br>अभ्यास वर्ग - ०६ ते १४ वर्षे |
| ३. | मोबाईल डे-केअर युनिटचा उददेश लाभ | १. पाल्यांचा संभाळ करणे<br>२. पाल्यांना पोषण आहार<br>३. आरोग्याची सुविधा उपलब्ध करणे.<br>४. पाल्यांना खेळणी उपलब्ध करून देणे<br>५. पाल्यांचा अभ्यास करून घेणे<br>६. शाळेतून गळती झालेल्या मुलांना |

| | | |
|---|---|---|
| | | शाळेत रूजू करणे.<br>७. शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणणे, |
| ४. | मोबाईल डे-केअर युनिटची स्थापना | पाळणाघर, बालवाडी, साक्षरता वर्ग व अभ्यास वर्ग चालविण्यासाठी किमान ३० पाल्य उपलब्ध असलेल्या ठिकाणी कार्यरत राहील. सदर बांधकाम ठिकाणावरील काम संपल्यानंतर तेथील पाल्यांना अन्य बांधकाम ठिकाणावर स्थापित मोबाईल डे-केअर युनिटमध्ये सामावून घेण्यात येईल. |
| ५. | योजना राबविणारे संस्था | अनुभवी स्वयंसेवी (NGO) संस्था किंवा अन्य संस्था |
| ६. | संस्थेची निवड | ई-निविदा पध्दतीने |
| ७. | योजनेवरील खर्च | उपकर निधीमधून |

प्रस्तावित योजनेस मंडळाच्या मान्यतेनंतर शासन मान्यतेअंती अनुभवी स्वयंसेवी संस्था (NGO) किंवा अन्य संस्थेची निवड करणे प्रस्तावित आहे, असे मत मंडळाचे सचिव यांनी व्यक्त केले.

मे. समर्थ भारत व्यासपीठ संस्था (ठाणे) या सेवाभावी संस्थेने दिनांक १५.०५.२०१७ रोजी मा. मंत्री महोदय (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न बैठकीत मोबाईल-डे-केअर बाबत सादरीकरण केले होते, असे मंडळाचे सचिव यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले. सदर योजना फारच चांगली असल्याचे मत श्री.मु. अ. नकवी (मा. संचालक, लेखा व कोषागारे) यांनी व्यक्त केले. सदर योजना लवकरच राबविण्यात यावी, असेही मत यांनी व्यक्त केले. यावर श्री. मगर (मालक प्रतिनिधी) यांनी सर्वच कामगार एकाच प्रांतातले नसतात, त्यामूळे मोबाईल डे-केअर युनिट (Mobile day Care) योजना राबविताना भाषेचा प्रश्न निर्माण होईल, असा मुद्दा उपस्थित केला. ज्या भाषेच्या कामगारांचे पाल्य जास्त असतील त्या भाषेत शिक्षण देण्यात यावे, असेही त्यांनी सुचविले होते.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला होता.

**ठराव: नोंदित बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी बांधकाम'च्या ठिकाणी मोबाईल डे-केअर युनिट (Mobile Day-Care Unit) सुविधा उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावित योजनेस मान्यता देण्यात आली. बांधकामाच्या ठिकाणी कार्यरत अन्य राज्यातील नोंदित बांधकाम कामगारांच्या पाल्यांशी त्यांच्या मातृभाषेत संवाद साधण्यात यावा व प्रस्तावित**

**योजनेस शासन मान्यता प्राप्त करून योजनेच्या कार्यान्वयनासाठी ई-निविदा पद्धतीने अनुभवी स्वयंसेवी संस्था/ अन्य अनुभवी संस्थेची नेमणूक करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात** आला.

मंडळाच्या दि. ०६.०६.२०१७ रोजीच्या मंजूर ठरावानुसार दि.२२.०६.२०१७ रोजी शासन मान्यतेस योजना मंजूरीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. शासनाच्या दि.२०.०७.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर योजनेबाबत अधिकची माहिती शासन स्तरावरून मागविण्यात आली होती. त्यास अनुसरून मंडळाच्या दि.२१.०८.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती शासनास सादर करण्यात आली होती.

उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन पत्र क्र. इबाका-२०१७/प्र. क्र.३७१/काम-७ दि.१२.०९.२०१७ व ०८.१२.२०१७ च्या पत्रान्वये सदर योजना राबविण्याबाबत तत्वत: मान्यता देण्यात आलेली आहे.

मंडळाच्या दि.२२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीत नोंदीत बांधकाम कामगारांच्या पाल्यासाठी प्रायोगिक तत्वावर मोबाईल डे केअर युनिट स्थापन करण्यासाठी मंडळाचे E-Goverance मे. KPMG च्या प्रतिनिधींनी मोबाईल डे केअर युनिटच्या RFP Document चे सादरीकरण केले होते. सदर सादरीकरणाची सॉफ्ट कॉपी सर्व मंडळ सदस्यांना देण्यात यावी, असे मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी मे. KPMG चे प्रतिनिधींना सुचना दिल्या व मंडळ सदस्यांनी सदर RFP Document मध्ये काही बदल करावयाचे असल्यास मे. KPMG यांना आठ दिवसात कळवावे. त्यानुसार सदर RFP मध्ये बदल करण्यात यावे, असेही सूचित केले. तसेच, सदर योजना राबविताना नोंदणीकरीता वेगळी पर्यायी व्यवस्था करण्यात यावी व पाल्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून मोबाईल-डे- केअर युनिट मध्ये CCTV बसविण्यात यावे, असेही सुचविले. त्यास मे. KPMG च्या प्रतिनिधींनी सहमती दर्शविली.

याबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

**ठराव: नोंदित बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी किमान ३० पाल्य उपलब्ध होवू शकतील अशा बांधकामाच्या ठिकाणी प्रायोगिक तत्वावर ५० ठिकाणी मोबाईल डे केअर युनिट स्थापना करण्यात यावी. सदर योजना सुरुवातीस मुंबई, MMR क्षेत्रात, पुणे व नागपूर या तीन ठीकाणी राबवावी. यासाठी मंडळाचे Consultant मे. KPMG यांनी सादरीकरण केलेल्या RFP Document ची प्रत ई-मेल द्वारे सर्व मंडळ सदस्यांना पाठवावी. मंडळ सदस्यांनी सदर RFP Document मध्ये काही बदल करावयाचे असल्यास मंडळाला आठ दिवसात कळवावे. तसेच पाल्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून मोबाईल-डे- केअर युनिट मध्ये CCTV बसविण्यात यावे व मंडळ**

**सदस्यांनी सुचविलेल्या बदलासह प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला होता.**

मंडळाच्या उपरोक्त ठरावानुसार RFP डॉक्युमेंटची प्रत दि.२५.०९.२०१७ रोजी ई-मेलद्वारे सर्व मंडळ सदस्यांना पाठविण्यात आली होती. मंडळ सदस्याकडून प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे दि.०४.१०.२०१७ रोजी सदर RFP डॉक्युमेंट बाबतचे अभिप्राय/ सुधारणा कळविण्याबाबत पुनश्च: विनंती करण्यात आली होती. त्यास अनुसरून मा. श्री. श्रीपाद कुटासकर व मा. श्री. विजय देवरुखकर यांनी निरंक अभिप्राय दि.०६.१०.२०१७ रोजी मंडळास सादर केले.

प्रस्तावित मोबाईल डे-केअर युनिट स्थापन करण्यासंदर्भात या क्षेत्रात कार्यरत स्वयंसेवी संस्थांची मंडळस्तरावर दि.०५.०१.२०१८ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत TISS, VIBHA, TARA MOBILE CRENCHE, THE SOCIETY FOR DOOR STEP SCHOOLS, UNISEF, श्रमजिवी संघ, सलाह, AITUC, समता भारत, महाराष्ट्र बांधकाम कामगार संघटना इत्यादी संस्थांचे १४ प्रतिनिधी उपस्थित होते. सदर बैठकीत मोबाईल डे-केअर युनिट स्थापन करणेबाबत विविध मुद्यांवर झालेल्या उपस्थित संस्था प्रतिनिधींना अभिप्राय कळविण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार ०३ संस्थांनी अभिप्राय सादर केले होते. सदर अभिप्रायातील ठळक मुद्दे खालीलप्रमाणे:

१. मंडळाने प्रति ५० स्त्री कामगार असलेल्या ठिकाणी एक युनिट प्रस्तावित केले त्या ऐवजी एका मोबाईल डे-केअर युनिटमध्ये १० ते ३० पाल्य असावेत.
२. सदर योजना ० ते ०६ वर्षे वयोगटाऐवजी ० ते १४ वर्षे वयोगटातील पाल्यांना लागू करावी.
३. मोबाईल डे-केअर युनिटमध्ये उपस्थित पाल्यांचे पालक नोंदीत बांधकाम कामगार नसल्यास त्यांना मंडळाकडे नोंदणी करण्यासाठी ०६ महिन्याचा अवधी देण्यात यावा.
४. मंडळाने सदर डे-केअर युनिट चालविण्यासाठी ई-निविदा मागविल्यास स्वयंसेवी संस्थांना (NGO) त्यांच्या बायलॉज नुसार निविदा प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही व परिणामी, स्वयंसेवी संस्थांना मोबाईल डे- केअर युनिटच्या कामामध्ये सहभागी होता येणार नाही.
५. मुद्दा क्र.०४ येथे नमूद परिस्थिती विचारात घेता मंडळाने मोबाईल डे-केअर युनिटद्वारे द्यावयाच्या सुविधा, मोबाईल डे-केअर युनिटमधील पाल्यांची संख्या, पाल्यांची ने-आण करण्यासाठी वाहन व्यवस्था इत्यादीचे निकष निश्चित करावे व इच्छुक संस्थांकडून मोबाईल डे-केअर युनिटचे प्रति पाल्य/प्रति माह दर प्राप्त करून मोबाईल डे-केअर युनिटचे काम इच्छुक व अनुभवी संस्थांना देण्यात यावे.
६. स्वयंसेवी संस्थांना द्यावयाचा मोबदला अनुदान स्वरूपात देण्यात यावा.

७. मोबाईल डे-केअर युनिटमध्ये खालील बाबींचा समावेश असावा.

- पाल्यांकरीता पौष्टीक आहार
- पाल्यांची आरोग्य तपासणी
- पाल्यांच्या व्यक्तिमत्व विकासाचे कार्यक्रम
- पालकांचा सहभाग, जबाबदारी व जागृती

मोबाईल डे-केअर युनिट स्थापन करणेबाबत उपरोक्त प्रमाणे करण्यात आलेली कार्यवाही व या क्षेत्रातील अनुभवी स्वंयसेवी संस्थांनी मंडळ स्तरावरील बैठकीतील चर्चेस अनुसरून सादर केलेल अभिप्राय विचारात घेऊन पुढील कार्यवाहीबाबतच्या निर्णयास्तव प्रस्ताव मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला आहे. यावर चर्चा करताना मा. अध्यक्ष महोदय यांनी सूचित केले की, मोबाईल डे-केअर युनिट चालविण्याचा अनुभव असलेले व अन्य राज्यात काम केल्याचा अनुभव असलेल्या संस्थांशी संपर्क साधून त्यांचे प्रस्ताव तपासणे योग्य राहील. सदर संस्थांचे आवश्यकतेनुसार सादरीकरण घेण्यात यावे व त्यानुसार मोबाईल डे-केअर युनिट स्थापन करणेबाबतचा सुधारित प्रस्ताव मंडळाच्या आगामी बैठकीत सादर करावा. असे सूचित केले. यास सर्व उपस्थित सदस्यांनी सहमती दर्शविली.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव क्र.४७(६)/२०१८: मंडळाकडे नोंदित बांधकाम कामगारांच्या पाल्यांकरीता पाळणा घराची सुविधा उपलब्ध करून देणेबाबत या क्षेत्रातील अनुभवी संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात यावे तसेच अन्य राज्यात सदर योजना राबविण्यात येत असल्यास त्याबाबत माहिती प्राप्त करून सुधारित RFP तयार करण्यात यावी व मंडळाच्या आगामी बैठकीत सादर करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र.०७: मंडळाच्या मुदत ठेव गुंतवणूकीकरीता उपसमितीची फेरनिवड व कार्यकक्षा निश्चित करण्याबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि.०२.११.२०१५ रोजीच्या बैठकीमध्ये मंडळाचा अतिरिक्त निधी विविध राष्ट्रीयकृत बँकेंत गुंतविण्याकरीता मंडळाच्या पदधिकाऱ्यांना गुंतवणुक प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेता येईल व गुंतवणुक उपसमिती स्थापन करून गुंतवणुकीचे निर्णय घेण्यात येईल, असे मा. अध्यक्ष यांनी सुचविले. गुंतवणुक उपसमिती स्थापन करण्याबाबत मा. अध्यक्षांनी व सर्व उपस्थितांनी मान्यता दिली. याबाबत गुंतवणुकीचे धोरण ठरविण्यासाठी खालीलप्रमाणे गुंतवणुक उपसमिती गठित करण्यात आली. सदर उपसमितीमध्ये खालील सदस्यांचा समावेश करण्यात आला होता.

१. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ.
२. मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. मा. संचालक लेखा व कोषागारे, मुंबई
४. श्री. अशोक भुताड, कामगार प्रतिनिधी
५. श्री. सतीश मगर, मालक प्रतिनिधी.

सदर उपसमितीस मंडळाच्या रक्कमेची गुंतवणुक करण्याचे संपूर्ण अधिकार असतील. तथापि, प्रत्येक महिन्याला गुंतवणुकीचा अहवाल मंडळासमोर ठेवावा, असे सर्वानुमते ठरविण्यात आले होते.

त्यानुसार मंडळाच्या अतिरिक्त निधीची शासन वित्त विभाग, शासन निर्णय दि. २७.१०.२०१५ मधील नमूद मार्गदर्शक सुचना व तत्वानुसार राष्ट्रीयकृत बँकांमध्ये गुंतवणुक करण्यात येत आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना अधिनियमाच्या कलम १८ (०१) नुसार सन २००७ मध्ये करण्यात आली आहे. शासन उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.२८.०५.२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंडळाची तीन वर्षाच्या कालावधीसाठी पुर्नस्थापना करण्यात आली होती.

शासन उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.३०.०६.२०१८ रोजीच्या शासन अधिसूचनेअन्वये मंडळाची पुढील तीन वर्षासाठी पुर्नस्थापना करण्यात आलेली आहे. त्यानुसार मंडळाचा अतिरिक्त निधी विविध राष्ट्रीयीकृत बँकेंत गुंतविण्याकरीता नव्याने उपसमिती गठित करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने मंडळाचा अतिरिक्त निधी विविध राष्ट्रीयीकृत बँकेंत गुंतविण्याकरीताखालील प्रमाणे नवीन उपसमिती गठित करणे व उपसमितीच्या कार्यकक्षा ठरविणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

**मंडळाची अतिरिक्त निधी गुंतवणूक उपसमिती**

| अ.क्र. | गुंतवणुक समिती सदस्य | पद |
|---|---|---|
| १. | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ. | अध्यक्ष |
| २. | मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सदस्य |
| ३ | श्री. अशोक भुताड | सदस्य |
| ४. | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | सदस्य-सचिव |

**मंडळाच्या अतिरिक्त निधी गुंतवणूक समितीची कार्यकक्षा**

१. मा. सर्वोच्च न्यायालय/केंद्र शासन/राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार मंडळाच्या अतिरिक्त निधीची गुंतवणुक करणे.
२. मंडळाच्या अतिरिक्त निधीची गुंतवणूक मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार केवळ राष्ट्रीयीकृत बँकेत करणे.
३. एका राष्ट्रीयीकृत बँकेत एका वेळी गुंतवणुकीची मर्यादा निश्चित करणे
४. एका राष्ट्रीयीकृत बँकेत एकुण गुंतवणुक करण्यासाठी रक्कमेची मर्यादा निश्चित करणे.
५. मंडळाच्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणुकीचा दर तिमाहीस आढावा घेऊन गोषवारा मंडळास सादर करणे.

वरीलप्रमाणे मंडळाच्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणुकीची उपसमिती गठित करणे व समितीच्या कार्यकक्षेबाबत मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.

याबाबत चर्चेत सहभागी होताना मा. अध्यक्ष यांनी असे सुचित केले की, सदर मुदत ठेव गुंतवणूकीच्या उपसमितीमध्ये एक कामगार प्रतिनिधी व एक मालक प्रतिनिधीचा समावेश असणे आवश्यक आहे. त्यानुसार मा. मालक प्रतिनिधी श्रीमती वेदा आगटे यांचा समावेश करण्यात यावा. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव क्र.४७(७)/२०१८: मंडळाच्या मुदत ठेव गुंतवणूकीकरीता उपसमिती खालीलप्रमाणे राहील**

| अ.क्र. | गुंतवणुक उपसमिती सदस्य | पद |
|---|---|---|
| १. | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष |
| २. | मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सदस्य |
| ३. | मा. श्रीमती वेदा आगटे (मालक प्रतिनिधी) | सदस्य |
| ४. | मा. श्री. अशोक भुताड (कामगार प्रतिनिधी) | सदस्य |
| ५. | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | सदस्य-सचिव |

मंडळाच्या अतिरिक्त निधी गुंतवणूक समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे:

१. मा. सर्वोच्च न्यायालय/केंद्र शासन/राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार मंडळाच्या अतिरिक्त निधीची गुंतवणुक करणे.

२. मंडळाच्या अतिरिक्त निधीची गुंतवणूक मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार केवळ राष्ट्रीयीकृत बँकेत करणे.

३. एका राष्ट्रीयीकृत बँकेत एका वेळी गुंतवणुकीची मर्यादा निश्चित करणे.

४. एका राष्ट्रीयीकृत बँकेत एकुण गुंतवणुक करण्यासाठी रक्कमेची मर्यादा निश्चित करणे.

५. मंडळाच्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणुकीचा दर तिमाहीस आढावा घेऊन गोषवारा मंडळास सादर करणे.

वरीलप्रमाणे ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०८: मंडळाच्या जिल्हा कार्यालयाकरीता शासनाच्या विविध विभागातील गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीने नेमणूक करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. इमारत २०१२/प्र. क्र.१६१/ कामगार७अ/दि. ०३.१०.२०१२ व दि.०४.१०.२०१२ नूसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाला पहिल्या टप्प्यात मंडळाचे मुख्यालय आणि राज्यातील १९ जिल्हयातील क्षेत्रिय कार्यालयांमध्ये गट -अ ते गट -ड संवर्गातील ५६ पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे, या ५६ पदांसाठींचे एकुण ११ संवर्गाचे सेवाप्रवेश नियम मंडळाच्या व तज्ञ समितीच्या मान्यतेनंतर शासन मान्यतेस दि.३०.०५.२०१८ रोजी सादर करण्यात आलेले आहेत.

मंडळाच्या दि. १८.०७.२०१७ रोजीच्या ४२ व्या बैठकीत मुख्यालय, ६ प्रादेशिक कार्यालये आणि ४१ क्षेत्रीय कार्यालये अशा त्रिस्तरीय रचनेकरिता एकुण ४१९ पदांच्या सुधारित आकृतीबंधास मंजूरी दिली आहे. (प्रत संलग्न) सदर ४१९ पदांमध्ये (एकुण २० संवर्ग) प्रथम टप्प्यात भरावयाच्या ११ संवर्गातील ५६ पदांचा समावेश आहे. उर्वरित ३६३ (४१९-५६) पदांचे एकुण ९ संवर्गांचे प्रारुप सेवाप्रवेश नियम सुध्दा तयार करून मंडळाच्या दि.२१.०३.२०१८ रोजीच्या बैठकीत मान्यता घेण्यात आली आहे. सदर सेवाप्रवेश नियमांना तज्ञ समितीच्या आगामी बैठकीत मान्यता घेणे प्रस्तावित आहे.

मंडळाकडे नोंदित बांधकाम कामगारांची संख्या, अटल विश्वकर्मा सन्मान योजनेअंतर्गत विशेष नोंदणी अभियानाच्या पहिल्या टप्प्यात झालेली नोंदणी, विशेष नोंदणी अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात अपेक्षित नोंदणी व नोंदीत जिवीत बांधकाम कामगारांना मंडळाच्या २८ कल्याणकारी योजनांच्या लाभ वाटपाबाबतची कार्यवाही विचारात घेता मंडळास अतिरिक्त अधिकारी कर्मचाऱ्यांची आवश्यकता विचारात घेवून दि. २२.०५.२०१८ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला आहे.

**ठराव ४६(१५)/२०१८- "श्री.बी.बी. शेंडगे, सेवानिवृत्त दुकाने निरिक्षक श्रेणी-२ यांना ६ महिन्याकरीता करार पद्धतीने कोल्हापूर कार्यालयात सेवानिवृत्त अधिकारी म्हणून नियुक्त करण्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.जिल्हा कार्यालयाकडे बांधकाम कामगारांची नोंदणी, नोंदणीचे नूतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांच्या लाभ वाटपाच्या अंमलबजावणी संबंधीचे प्रकरण हाताळण्यासाठी राज्यस्तरीय मराठी वर्तमानपत्रात जाहिर सुचना प्रसिद्ध करून नजीकच्या कालावधीत गट-अ/ गट-ब मधून**

**सेवानिवृत्त झालेल्या व चांगले प्रकृतीमान असणाऱ्या अधिकाऱ्यांची प्रथम ६ महिन्याच्या कालावधीसाठी करारपद्धतीने सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील अटी आणि शर्तीनुसार नियुक्त करण्यात यावीव आवश्यकतेनुसार मुदतवाढ देण्यात यावी. प्रत्येक जिल्हा कार्यालयास गट-अ/ गट-ब मधील २ याप्रमाणे सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी. तसेच, बाहययंत्रणेद्वारे कंत्राटी पद्धतीने नियुक्त करावयाच्या अतिरिक्त (पुर्वीचे मंजूर १८८ पदांशिवाय) कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव सर्व जिल्हा कार्यालयांकडून प्राप्त करून एकत्रित प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा. शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी."**

मंडळाच्या उपरोक्त ठरावानूसार बाहय यंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने कार्यरत कर्मचाऱ्याशिवाय अतिरिक्त कर्मचाऱ्यांची मागणी मंडळाकडे नोंदविणेबाबत जिल्हा कार्यालयांना दि.१५.०५.२०१८ पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानूसार सर्व जिल्हा कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार ८२ अतिरिक्त कर्मचाऱ्यांची मागणी सादर करण्यात आली होती. सदर माहितीची छाननी करून जिल्हयातील नोंदीत बांधकाम कामगार, नोंदीत जिवीत बांधकाम कामगारांची संख्या व लाभ वाटपाबाबतचे कामकाज विचारात घेऊन आवश्यक तेवढया अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करणे प्रस्तावित आहे. सदर अतिरिक्त कर्मचारी नियुक्तीबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात येत आहे.

याशिवाय मंडळाच्या मंजूर उपरोक्त ठरावानुसार जिल्हा कार्यालयाकडे बांधकाम कामगारांची नोंदणी, नोंदणीचे नूतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांच्या लाभ वाटपाच्या अंमलबजावणी संबंधीचे प्रकरण हाताळण्यासाठी राज्यस्तरीय दि. ११ जुन २०१८ रोजीच्या दैनिक लोकमत या वृत्तपत्रात जाहिर सूचना प्रसिध्द करुन गट अ/गट ब मधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांचे अर्ज मागविण्यात आले होते. सदर जाहीर सूचनेच्या प्रतिसादामध्ये एकूण ५८ सेवा निवृत्त गट- अ/ब अधिकाऱ्यांनी अर्ज सादर केले होते. विभागनिहाय अर्जांचा तपशिल खालीलप्रमाणे:

| अ.क्र. | विभागाचे नाव | प्राप्त अर्ज संख्या |
|---|---|---|
| १. | कोकण | ०८ |
| २. | अमरावती | ०६ |
| ३. | नागपुर | ०८ |
| ४. | औरंगाबाद | १७ |
| ५. | नाशिक | ०९ |

| | | |
|---|---|---|
| ६. | पूणे | १० |
| | एकूण | ५८ |

विभागनिहाय प्राप्त अर्ज संबंधित विभागाच्या अप्पर कामगार आयुक्त/ कामगार उपआयुक्त यांच्याकडे पाठविण्यात आलेले आहेत. अप्पर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त यांच्या स्तरावर समिती गठीत करून निवड प्रक्रिया राबविणेबाबत संबंधितांना कळविण्यात आलेले आहे. त्यानूसार कोकण विभागाकरिता प्राप्त ०८ विनंती अर्जानुसार दि.११.०७.२०१८ रोजी मुलाखती आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर मुलाखतीसाठी ०८ अर्जदारांपैकी ०६ अर्जदार उपस्थित होते. त्यानुसार ०५ जिल्हयांकरीता प्रत्येकी ०१ व मुख्यालय येथे ०१ अशी एकूण ०६ सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे. संबंधितांना दि.१२.०७.२०१८ रोजी नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. कोकण विभागा व्यतिरिक्त अन्य विभागाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

मंडळाने वेळोवेळी पारीत केलेले ठराव व शासन मान्यतेनूसार मंडळाचे मुख्यालय ६ प्रादेशिक कार्यालये (जिल्हा कामगार सुविधा केंद्रासह) व उर्वरित ३५ ठिकाणी प्रत्येकी ०१ कामगार सुविधा केंद्र (WFC) स्थापन केले जाणार असून तेथे नोंदित बांधकाम कामगारांची नोंदणी, नूतनीकरण आणि कल्याणकारी योजनांचे लाभ वाटप अशी कामे केली जाणार आहेत. कामगार विभागांतर्गत जिल्हा कार्यालयांत कार्यरत सहाय्यक कामगार आयुक्त/ सरकारी कामगार अधिकारी यांच्या मंजूर पदांपैकी मोठया प्रमाणावर पदे रिक्त असल्यामुळे सद्यस्थितीत बांधकाम कामगारांच्या नोंदणी व लाभ वाटपावर विपरीत परिणाम होत आहे. यास्तव सर्व जिल्हा कार्यालयांमध्ये स्वतंत्रपणे काम करु शकणाऱ्या गट-अ दर्जाच्या अधिकाऱ्याची (कार्यालय प्रमुख) आवश्यकता आहे.

शासनाच्या सामाजिक न्याय विभाग, महसूल व वन विभाग, आदिवासी विकास विभाग, ग्राम विकास विभाग अशा विभागातील कल्याणकारी योजना राबविण्याचा अनुभव असणाऱ्या गट-अ दर्जाच्या अधिकाऱ्यांना मंडळात प्रतिनियुक्तीवर घेणे प्रस्तावित आहे. त्यासाठी गट-अ दर्जाच्या अधिकाऱ्यांची सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१७.१२.२०१६ व दि. १६.०२.२०१८ मध्ये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार वर्तमानपत्रात जाहीर सूचना प्रसिध्द करून मंडळाच्या प्रत्येक कार्यालयाकरीता ०१ याप्रमाणे एकूण ४१ अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येईल. मंडळाकडून प्रसिध्द होणाऱ्या जाहीर सुचनेच्या प्रतिसादामध्ये प्राप्त अर्जाची छाननी करून नियुक्तीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाहीसाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

मंडळाच्या प्रत्येक कार्यालयांकरीता ०१ या प्रमाणे सहाय्यक कामगार आयुक्त या पदावर प्रस्तावित विभागांतील गट अ दर्जाच्या अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने नियुक्तीबाबतचा प्रस्ताव शासन मान्यता प्राप्त करून पुढील कार्यवाही करण्यात येईल. मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात येत आहे.

यावर मा. कामगार आयुक्त यांनी असे सुचित केले की, शासनाच्या विविध विभागातील गट- अ संवर्गातीलअधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीने नेमणूक केल्यास मंडळाच्या कामकाजामध्ये अधिक गतीमानता येईल व मंडळाचे कामकाज अधिक चांगल्या रितीने सुरळीत होण्यास मदत होईल, त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव क्र.४७(८)/२०१८: मंडळाच्या जिल्हा कार्यालयाकरीता शासनाच्या विविध विभागातील गट- अ संवर्गातील अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, सदर नियुक्तीबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात यावा शासन मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** |
| **कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषयक्र.०९: मंडळाचे मा. सदस्य (कामगार प्रतिनिधी) श्री. कुटासकर यांनी सुचित केलेले विषय**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मंडळाचे सदस्य मा. श्री. कुटासकर (कामगार प्रतिनिधी) यांनी त्यांच्या दि.११.०७.२०१८ रोजीच्या पत्रान्वये खालील विषय मंडळाच्या बैठकीत सादर करणेबाबत सूचित केलेले आहे.

**अ) मंडळाचे सदस्यांना योजनांचे वाटप करण्यासाठी मोहीम सुरू करणेबाबत: -**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मा. प्रधान सचिव कामगार यांच्या अध्यक्षतेखाली व कामगार आयुक्त यांच्या उपस्थितीत दि.०६.०६.२०१८ रोजी अप्पर कामगार आयुक्त, कामगार उप आयुक्त व सर्व कार्यालय प्रमुखांच्या बैठकीत अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत विशेष नोंदणी अभियानाची रूपरेषा निश्चित करण्यात आली. त्यानुसार राज्यातील १२ जिल्हयात सदर अभियान राबविण्यात येत आहे. सदर अभियानात खालील उददीष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

- अनोंदीत बांधकाम कामगारांची नोंदणी करणे.
- नोंदीत बांधकाम कामगारांचे नुतनीकरण करणे.
- मे २०१८ पूर्वीचे सर्व प्रलंबित लाभाचे अर्ज निकाली काढणे.
- लाभाचे नवीन अर्ज स्विकारणे.

उपरोक्त बैठकीत निश्चित करण्यात आलेल्या उददीष्टांबाबत सर्व कार्यालयांना कळविण्यात आलेले आहे त्यानुसार अभियानातील १२ जिल्हे व अन्य जिल्हयातील प्रलंबित लाभाचे अर्ज निकाली काढणे अपेक्षित आहे. सबब, मंडळाकडे नोंदीत बांधकाम कामगारांना लाभ वाटप करण्याची बाब प्रस्तावित अभियानात समाविष्ट करण्यात आली आहे.

याबाबत मा. कामगार प्रतिनिधी श्री. कुटासकर यांनी असे सादर केले की, बऱ्याच जिल्हयामध्ये प्राप्त अर्जांच्या क्रमवारीनुसार लाभ वाटप करण्यात येत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सर्व अर्जांची छाननी करून प्राप्त अर्जांच्या क्रमवारीनुसार लाभाचे वाटप करण्यात यावे व जास्तीत जास्त बांधकाम कामगारांना लाभ देण्यात यावा असेही मत व्यक्त केले. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

**ब) मंडळाचे काम कामगार आयुक्त कार्यालयाकडून काढून कामगार कल्याण मंडळाकडे सोपविणेबाबत: -**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, कामगार कल्याण मंडळाचे मुख्यालय मुंबई येथे असून ०७ विभागीय कार्यालये, १८ गट कार्यालये व २४० कामगार कल्याण केंद्रे

कार्यरत असून आजमितीस सदर कार्यालयात कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कार्यरत अधिकारी/ कर्मचारी | संख्या |
|---|---|---|
| १. | अधिकारी वर्ग | १३ |
| २. | पर्यवेक्षकीय तथा प्रशासकीय कर्मचारी वर्ग | १७९ |
| ३. | शैक्षणिक तथा संस्थात्मक कार्यक्रम संलग्न कर्मचारी वर्ग | १९ |
| ४. | कार्यक्रम कर्मचारी वर्ग | ५५७ |
| ५. | एकूण पूर्णवेळ कर्मचारी | ७६८ |
| ६. | अर्धवेळ कर्मचारी | ५२९ |
| | **एकूण** | **१२९७** |

शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग दि.०२.०१.२०१८ अन्वये कामगार कल्याण मंडळातील खालील अधिकाऱ्यांना नोंदणी अधिकारी म्हणून घोषित केलेले आहे. कामगार कल्याण मंडळाचे घोषित केलेले अधिकारी व उपलब्ध अधिकाऱ्यांचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | घोषित केलेले अधिकारी | संख्या |
|---|---|---|
| १. | सहाय्यक कल्याण आयुक्त (मुख्यालय वगळून) | ०७ |
| २. | कामगार विकास अधिकारी (सर्व) | ०३ |
| ३. | कामगार कल्याण अधिकारी (सर्व) | ०३ |
| | **एकूण** | १३ |

सद्यस्थितीत मंडळाचे ४२ जिल्हयातून नोंदणी व लाभ वाटपाची कार्यवाही कामगार आयुक्त यांच्या अंतर्गत क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून करण्यात येते. कामगार कल्याण मंडळाकडील घोषित नोंदणी अधिकाऱ्यांचा उपरोक्त तपशील विचारात घेता कामगार कल्याण मंडळाकडे अल्प प्रमाणात नोंदणी अधिकारी उपलब्ध असल्याचे दिसून येते. तसेच, लाभ वाटपाची कार्यवाही जिल्हास्तरावरील सहाय्यक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी यांच्या स्तरावरून होत असल्याने लाभ वाटपाकरीताही कामगार कल्याण मंडळाकडे जिल्हास्तरावर पुरेसे अधिकारी उपलब्ध नाहीत त्यामुळे मंडळाचे काम कामगार आयुक्त कार्यालयाकडून काढून घेतल्यास नोंदणी व लाभ वाटपाकरीता अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब विचारात घेता मंडळाच्या नोंदणी व लाभ वाटपाचे काम कामगार आयुक्त कार्यालयाकडून काढून न घेता मंडळाच्या स्वतंत्र अधिकारी/ कर्मचाऱ्यांची नेमणूक होईपर्यंत कामगार आयुक्त कार्यालयाकडेच कार्यभार ठेवावा व कामगार कल्याण मंडळाकडील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे

मदत घेण्यात यावी असे प्रस्तावित करण्यात येत आहे. मंडळाच्या मान्यतेनुसार प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

यावर मा. कामगार आयुक्त यांनी असे मत व्यकत केले की, मंडळाचे कामकाज कामगार आयुक्त कार्यालयाकडून काढून कामगार कल्याण मंडळाकडे सोपविणे उचित ठरणार नाही. सदर काम यथाप्रस्तावित मंडळाच्या स्वंतत्र अधिकारी/कर्मचाऱ्यांची नेमणूक होईपर्यंत कामगार आयुक्त कार्यालयाकडेच ठेवून कामगार कल्याण मंडळाकडून मदत घेण्यात यावी. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

**क) ज्या अधिकाऱ्यांना नोंदणी अधिकारी म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे त्यांच्या प्रशिक्षणाची योजना करणेबाबत: -**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी कामगार विभागाशिवाय अन्य विभागातील गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मुख्याधिकारी नगरपरिषद, प्रभाग क्षेत्र अधिकारी (वॉर्ड ऑफिसर) महानगरपालिका, उपअभियंता (सार्वजनिक बांधकाम/ जलसंधारण विभाग/ पाणी पुरवठा विभाग) व कामगार विभागातील कामगार कल्याण मंडळाचे अधिकाऱ्यांना उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.०२.०१.२०१८ रोजीच्या शासन आदेशान्वये नोंदणी अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. उक्त नोंदणी अधिकाऱ्यांना बांधकाम कामगारांच्या नोंदणीबाबत द्यावयाचे प्रशिक्षण देण्यासाठी विभागीय स्तरावर कार्यशाळा आयोजित करणे प्रस्तावित आहे.

**ड) बांधकाम कामगारांकडून प्रमाणपत्र घेण्याऐवजी Self Declaration घेण्याबाबत: -**

बांधकाम कामगारांना प्रमाणपत्र घेण्याऐवजी स्वयंसाक्षांकित प्रमाणपत्र घेण्याबाबत मंडळाच्या दि.१८.०७.२०१७ रोजीच्या बैठकीत विषय सादर करण्यात आला होता. सदर बैठकीत नोंदणीसाठी ९० दिवसाच्या प्रमाणपत्राची अट शिथील करत नाही तोपर्यंत नोंदणीत वाढ होणार नाही, असे मत व्यक्त केले. त्यावर मा. कामगार आयुक्त यांनी असे निर्दशनास आणून दिले की, कायद्यातील तरतुदीनुसार बांधकाम कामगारांने मागील वर्षभरात ९० दिवस काम केल्याचे मालकाने दिलेले प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. कामगारांना सदर प्रमाणपत्र मिळण्यास येणाऱ्या अडचणी लक्षात घेवून महाराष्ट्र शासनाने दिनांक १३.०८.२०१४ अन्वये ज्या बांधकाम कामगारांचे मालक सतत बदलणारे आहेत अशा बांधकाम कामगारांना ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, नगरपरिषदेचे मुख्य अधिकारी, महानगरपालिकेचे प्राधिकृत अधिकारी यांना ९० दिवसाचे प्रमाणपत्र देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. सदर बाब कायदेशीर असून केंद्राने सदर कायद्यात बदल केल्याशिवाय ९० दिवसाच्या प्रमाणपत्राची अट शिथिल करता येणार नाही, असे नमूद केले.

त्यावर मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी असे सुचविले की, जास्तीत जास्त कामगारांची नोंदणी होण्यासाठी उक्त नियमांमध्ये सुधारणा करणेसाठी तसेच बांधकाम कामगारांची ते बांधकाम कामगार असल्याचे, त्यांनी मागील वर्षभरात कमीत कमी ९० दिवस काम केल्याचे, कामाचा कालावधी, संबंधित मालकाचा व बांधकामाच्या ठिकाणाचा (Construction Site) इत्यादी तपशिल नमुद केलल्या शपथपत्राच्या आधारे (Self Certification) नोंदणी करण्यासाठी मंडळाने ठराव घेऊन मान्यतेस्तव शासनास पाठवावा.

याबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव: इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम १९९६ चे कलम १२ (१) नुसार बांधकाम कामगारांच्या नोंदणी व नुतणीकरणाकरीता मागील वर्षी कमीत कमी ९० दिवस काम केले असणे बंधनकारक आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (नियमन व सेवाशर्ती) नियम २००७ च्या नियम ३३(३)(c) मधील तरतूदीनुसार बांधकाम कामगारांने मागील वर्षभरात ९० दिवस काम केल्याचे मालकाने दिलेले प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. तथापि, नियमातील सदर तरतूदीमध्ये बदल करून बांधकाम कामगारांचे स्वयं साक्षांकित प्रमाणपत्र (Self Certification) घेऊन नोंदणी करण्याबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव शासनास सादर करण्यात यावा.**

उक्त ठरावाच्या अनुषंगाने बांधकाम कामगारांच्या नोंदणीकरीता स्वंयसाक्षांकित प्रमाणपत्र देणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त चारही मुद्यांवर सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आले.

**ठराव क्र.४७(९)/२०१८: अ) मंडळाचे सदस्यांना योजनांचे वाटप करण्याबाबत प्राप्त अर्जांची छाननी करून क्रमवारीनुसार अर्जाच्या लाभाचे वाटप करण्यात यावे, लाभवाटपाची कार्यवाही आगामी एका महिन्यात पूर्ण करण्याच्या सूचना क्षेत्रिय कार्यालयास देण्यात याव्यात.**

**ब) मंडळाच्या स्वंतत्र अधिकारी/कर्मचाऱ्यांची नेमणूक होईपर्यंत मंडळाचे कामकाज यथास्थित कामगार आयुक्त कार्यालयाच्या अधिपत्याखालील कार्यालयांकडेच असावे व कामगार कल्याण मंडळाच्या अधिकारी/ कर्मचारी तसेच कामगार कल्याण मंडळाच्या प्रादेशिक कार्यालये, गट कार्यालये व कामगार कल्याण केंद्र या क्षेत्रिय कार्यालयांची मदत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील कामगारांची नोंदणी, लाभ वाटप व इतर अनुषंगिक कामाकरीता घेण्यात यावा याबाबत तसेच कामगार कल्याण मंडळाच्या केंद्र प्रमुखांनाही "नोंदणी अधिकारी" घोषित करणे बाबतचा**

प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

क) उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.०२.०१.२०१८ रोजीच्या शासन आदेशान्वये अन्य विभागातील घोषित करण्यात आलेल्या नोंदणी अधिकाऱ्यांना बांधकाम कामगारांची मंडळाकडे नोंदित करण्याबाबतचे प्रशिक्षण देण्यासाठी विभागीय स्तरावर कार्यशाळा आयोजित करण्यात यावी व

ड) बांधकाम कामगारांकरीता आस्थापनाकडून ९० दिवसाचे प्रमाणपत्र घेण्याऐवजी बांधकाम कामगारांचे Self Declaration घेण्याबाबत प्रस्ताव शासन मान्यतेस सादर केलेला आहे. शासन मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र.१०:मंडळाच्या www.mahabocw.inया संकेतस्थळाची वार्षिक देखभाल (Annual Maintenance) दुरुस्तीकरीता संस्था नियुक्ती व वार्षिक अंदाजित खर्चास मान्यता देणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मंडळाच्या दिनांक ०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये मंडळाचे संकेतस्थळ मे. केपीएमजी या सल्लागार कंपनीच्या सहाय्याने विकसित करण्याबाबत सर्वानुमते ठराव पारित करण्यात आला आहे. त्यानूसार मे. केपीएमजी या सल्लागार कंपनीने संकेतस्थळ विकसित करण्यासाठी आवश्यक माहिती दि.१७.०६.२०१७ रोजी मंडळास सादर केलेली होती.

त्यानूसार मंडळाचे संकेतस्थळ विकसित करण्यासाठी त्या क्षेत्रातील तज्ञ कंपन्यांना दरपत्रके पाठविण्याबाबत मंडळाच्या दिनांक २०.०६.२०१७ पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे प्राप्त दरपत्रकामधून M/s. Kascom Infosolutions, Andheri, Mumbai यांचे दरपत्रकानुसार न्यूनतम दर असल्यामुळे त्यांना मंडळाच्या दिनांक ०१.०७.२०१७ रोजीच्या पत्रान्वये संकेतस्थळ विकसीत करण्याचे आदेश देण्यात आले होते.

त्यानुसार सदर कंपनीने मंडळाचे संकेतस्थळ (Web Site) विकसित केले. मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते दिनांक २३.०२.२०१८ रोजी मंडळाच्या संकेतस्थळाचे उद्‌घाटन करण्यात आले होते.

मंडळाच्या सदर संकेतस्थळावर मंडळ, केंद्र शासनाचे अधिनियम, नियम व राज्य शासनाचे नियम व उपकर अधिनियमाबाबतची माहिती तसेच बांधकाम कामगारांची नोंदणीनुतनीकरण व त्यांच्याकरीता मंडळातंर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची व अन्य माहिती, प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

मंडळाचे www.mahabocw.in हे संकेतस्थळ विकसीत होवून ते कार्यरत असून, त्याची वार्षिक देखभाल (Annual Maintenance) व आवश्यक बदल करुन ते अद्ययावत करणे आवश्यक आहे. त्यासाठी वार्षिक अंदाजे रुपये ३ लाख खर्च अपेक्षित आहे.

तरी, उपरोक्त अंदाजित खर्चास अनुसरुन मंडळाचे संकेतस्थळाची वार्षिक देखभाल (Annual Maintenance) व आवश्यक बदल करुन ते अद्ययावत करण्यासाठी सदर क्षेत्रातील तज्ञ व्यवस्थापन कंपनीची प्रथम एक वर्षासाठी नियुक्ती करणे व दरवर्षी मुदतवाढ अथवा नवीन संस्था निश्चित करणेबाबत व वार्षिक अंदाजित रुपये ३ लक्ष खर्चास मंडळाच्या मान्यतेस्तव सादर.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव क्र.४७(१०)/२०१८ : मंडळाच्या www.mahabocw.in या संकेतस्थळाची वार्षिक देखभाल (Annual Maintenance) दुरुस्तीकरीता व आवश्यक ते बदल करुन संकेतस्थळ अद्ययावत (Update) करण्यासाठी सदर क्षेत्रातील तज्ञ व्यवस्थापन कंपनीची प्रथम एक वर्षासाठी दरपत्रके मागवून न्यूनत्तम दराने नियुक्ती करण्यास, देखभाल दुरूस्तीच्या अंदाजे रुपये ३ लक्ष एवढया खर्चास व नियुक्त संस्थेचे काम समाधानकारक असल्यास वार्षिक मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**<br>**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**<br>**कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **अध्यक्ष**<br>**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**<br>**कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र.११: माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या शासन निर्णयानुसार मंडळावर नियुक्त e-Gov चे सल्लागार मे. केपीएमजी यांच्या मासिक मोबदल्याचे सुधारित दर मंजूर करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मे. केपीएमजी या संस्थेच्या नेमणूकीबाबत मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

"मंडळांतर्गत कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणाली बाह्ययंत्रणेमार्फत तयार करुन घेणेबाबत तयार करण्यात आलेले RFP Document व ई-निविदा रद्द करण्यात यावी. मंडळामार्फत नियुक्त करण्यात आलेले IT Consultant मे. अर्न्स्ट अँन्ड यंग एल पी पी यांची नियुक्ती रद्द करण्यात यावी. त्याऐवजी KPMG या IT Consultant ची नियुक्ती करण्यात यावी व त्यांचेकडून सदर कामाचे नव्याने RFP Document तयार करून घेण्यात यावे. नव्याने तयार करण्यात आलेल्या RFP Document मंडळाचे बैठकीसमोर ठेवून त्यावर चर्चा करून त्यास मंडळाची मान्यता घेवून पुन्हा मंडळ स्तरावर ई-निविदा प्रसिद्ध करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला."

दि.२३.०५.२०१६ रोजीच्या पत्रान्वये मे. केपीएमजी यांनी यांनी अतिरिक्त मनुष्यबळाची मागणी केली होती त्या मागणीस अनुसरून मंडळाच्या बैठकीत शासन निर्णयातील मुदत व वेळोवेळी प्राप्त होणारी मुदतवाढ विचारात घेऊन नेमणूकीचे आदेश देण्यात यावेत, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. त्यानुसार मे. केपीएमजी यांना अतिरिक्त मनुष्यबळ नियुक्त करून पुढील कार्यवाही करण्याबाबत दि.१३.०६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये निर्देशित करण्यात आलेले होते.

माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या शासन निर्णयाची मुदत दि.३० जून २०१७ रोजी संपली असल्याने मंडळाच्या इतर योजनांच्या RFP डॉक्युमेंटस बनविण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. याबाबी विचारात घेऊन मे. केपीएमजी यांना शासन माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील निविदा प्राक्रिया पूर्ण होईपर्यंत अथवा ०१ जुलै २०१७ पासून पुढील ०६ महिन्यांकरीता मुदत वाढ दि.१८.०७.२०१७ रोजीच्या बैठकीत देण्यात आली होती.

माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.०९.१०.२०१७ रोजीच्या शासन आदेशान्वये दि.३०.०९.२०१७ पूर्वी नियुक्त केलेल्या सल्लगार संस्थेस दि.३१.०३.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

मंडळाच्या बैठकीत नवीन योजना राबविणेबाबत वेळोवेळी पारित केलेले ठराव व सदर योजनांना शासन स्तरावरून प्राप्त मान्यतेस अनुसरून करावयाच्या कार्यवाहीकरीता मे.

केपीएमजी या सल्लागाराची सेवा यापुढेही आवश्यक असल्याने मे. केपीएमजी या सल्लागार संस्थेच्या नेमणूकीस माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.०९.१०.२०१७ च्या शासन आदेशान्वये दि.३१.०३.२०१८ पर्यंत मुदतवाढ देणेबाबत मंडळाच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

त्यानुसार मंडळाचे मा. अध्यक्ष तथा मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी मंडळाच्या दि.०३.०१.२०१८ रोजीच्या बैठकीत मंडळाच्या योजनांचे RFP तयार होईपर्यंत मे. केपीएमजी यांना मुदत वाढ देण्यात यावी असे सुचविले. याबाबत मा. प्रधान सचिव (कामगार) यांनी दिनाक ३१ मार्च २०१९ पर्यंत मुदत वाढ देण्यात यावी असे प्रस्तावित केले होते. त्यानुसार मे. केपीएमजी यांना दि.३१ मार्च २०१९ पर्यंत मुदतवाढीबाबत मंडळ बैठकीत ठराव पारित करण्यात आला होता व त्यानुसार मे. केपीएमजी यांना मुदतवाढ देण्यात आली आहे.

माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.०१.०७.२०१४ रोजीचा शासन निर्णयातील सल्लागाराचे दर दि.२०.०३.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये दर सुधारित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार मे. केपीएमजी यांना देय रक्कमेचा तपशील खालीलप्रमाणे

| **दि.०१.०७.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सल्लागारांचे मासिक दर (कराशिवाय)** | | | | **दि.२०.०३.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सल्लागारांचे मासिक दर (करांशिवाय)** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पद | संख्या | दर (लाखात) | मासिक खर्च | पद | संख्या | दर (लाखात) | मासिक खर्च |
| प्रधान सल्लागार | ०१ | २.७५ | २.७५ | प्रधान सल्लागार | ०१ | ३.२४ | ३.२४ |
| वरिष्ठ सल्लागार | ०२ | २.२० | ४.४० | वरिष्ठ सल्लागार | ०२ | २.५२ | ५.०४ |
| सल्लागार | ०३ | १.६० | ४.८० | सल्लागार | ०० | २.२५ | ०० |
| सहाय्यक सल्लागार | ०० | -- | -- | सहाय्यक सल्लागार | ०३ | १.८० | ५.४० |
| एकूण | | | ११.९५ | एकूण | | | १३.६८ |

मे. केपीएमजी या e-Gov सल्लागार संस्थेस शासन निर्णय दिनांक २०.०३.२०१८ अन्वये सुधारित दर लागू करणे प्रस्तावित आहे. प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेकरीता सादर करण्यात आला आहे.

यावर मा. मालक प्रतिनिधी श्रीमती वेदा आगटे व मालक प्रतिनिधी श्री. कुटासकर यांनी सदर सल्लागारांची मंडळाला आवश्यकता आहे का, अशी विचारणा केली. तसेच e-Gov च्या सल्लागारांचे वेतन हे फार जास्त प्रमाणात आहे, असे मत व्यक्त केले.

याबाबत मंडळ सचिवांनी स्पष्ट केले की, मंडळाने वेळोवेळी पारित केलेल्या ठरावानुसार सुरक्षा संच वाटप, अत्यावश्यक संच वाटप, एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली (IWBMS), कामगार जिल्हा सुविधा केंद्र (WFC) व मध्यान्ह भोजन वाटप (०३ निविदा) अशा ०७ निविदाबाबतची कार्यवाही पूर्ण झाली अथवा प्रगतीपथावर आहे. याशिवाय नोंदीत बांधकाम कामगारांकरीता सायकल वाटप, बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी, बांधकाम कामगारांकरीता मोबाईल टॉयलेट, बांधकाम कामगारांकरीता नाक्याच्या ठिकाणी शेड उभारणे, बांधकाम कामगारांकरीता मोबाईल डे-केअर युनिटची सुविधा पुरविणे, मंडळाकडे जमा होणाऱ्या उपकर रक्कमेच्या व्यवस्थानापनाकरीता सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या मदतीने संगणकीय प्रणाली विकसित करणे या संबंधी ई-निविदा मागविण्यासाठी RFP चे प्रारूप तयार करणे, मंडळ बैठकीत सादरीकरण करणे, शासनस्तरावर सादरीकरण करणे, HPC कडे सादरीकरण करणे, सुचविण्यात आलेले बदल समाविष्ट करून सुधारित RFP तयार करणे, शासनमान्यतेअंती ई-निविदा प्रक्रिया राबविण्यास मदत करणे, निविदा पूर्व बैठक, प्राप्त निविदांची तांत्रिक छाननी करणे, पात्र निविदाकारांच्या दरपत्रकांची छाननी करण्याकरीता मंडळास मदत करणे या व अनुषंगिक बाबींवर कार्यवाही करण्याकरीता सल्लागारांची मदत घेण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.०१.०७.२०१४ रोजीच्या आदेशान्वये नियुक्त ०५ संस्थांपैकी मे. केपीएमजी या संस्थेची नेमणूक मंडळाच्या दि.२८.०२.२०१७ रोजीच्या बैठकीत मंजूर ठरावानुसार करण्यात आली होती तसेच, तदनंतर वेळोवेळी मंडळाने पारित केलेल्या ठरावानुसार माहे मार्च २०१९ पर्यंत त्यांच्या नेमणुकीस मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयातील मंजूर दराने मासिक मोबदला अदा करण्यात येत आहे. तथापि, माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.२०.०३.२०१८ रोजीच्या शासन आदेशान्वये सल्लागारांच्या मासिक मोबदल्याचे दर सुधारित करण्यात आलेले आहे. त्यानुसार मासिक मोबदला अदा करण्यासाठी मंडळाच्या मान्यतेस प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. यावर मा. अध्यक्षांनी सुचित केले की, याबाबत मा. मंत्री महोदय (कामगार) यांच्याशी चर्चा करून मंडळाच्या आगामी बैठकीत निर्णय घेणे योग्य राहील. यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव क्र.४७(११)/२०१८: शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या पॅनेलवर नियुक्त संस्थेपैकी मे. केपीएमजी यांची मंडळाचे e-Gov सल्लागार म्हणून मंडळाच्या मान्येतने नियुक्ती करण्यात आलेली आहे. माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या शासन निर्णय दि.२०.०३.२०१८ रोजीच्या आदेशान्वये शासनाच्या पॅनेलवरील सल्लागारांचे मासिक**

मोबदल्याचे दर सुधारित करण्यात आलेले आहेत. मंडळाकडील मे. केपीएमजी यांना शासन आदेशाच्या दिनांकापासून सदर सुधारित दर लागू करण्यासाठीचा प्रस्ताव मंडळाच्या आगामी बैठकीत सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.१२: मंडळाच्या उपकर परताव्याच्या प्रकरणांस मंडळाची मान्यता प्रदान करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर नियम १९९८ मधील कलम ८ अन्वये उपकराची परिगणना चूकीची झाल्यास अथवा चुकीच्या पध्दतीने उपकराचा भरणा मंडळाकडे झाल्यास तो परतावा करण्याबाबत तरतूद आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या बँक खात्यात विविध प्राधिकरणे/संस्था/व्यक्ती यांजकडून अनावधानाने/नजरचुकीने जमा होणाऱ्या उपकराच्या रकमेच्या परताव्याबाबत मंडळाच्या दि.२१.०३.२०१८ रोजीच्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला होता.

**ठराव: मंडळाच्या दि. १६.०६.२०१८ च्या बैठकीतील ठरावानुसार उपकराच्या एकूण ११ प्रकरणांचा परतावा करताना सदर प्रकरणे संबंधित जिल्हा कार्यालयांकडून छाननी करुन विभागीय कार्यालयामार्फत परताव्याच्या शिफारस प्राप्त झाल्यानंतर मंडळ स्तरावरून छाननीअंती प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा. शासन मान्यतेनुसार मंडळ स्तरावरुन परताव्याची कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

सद्यस्थितीत, मंडळाकडे नव्याने उपकर परताव्याची दोन प्रकरणे प्राप्त झालेली आहे. सदर प्रकरणांमध्ये श्री. दत्ताबाळ मिशन डिव्हाइन कोल्हापूर यांजकडून बांधकाम परवानगी रद्य करण्यात आल्यामुळे भरणा केलेल्या उपकराच्या परताव्याची मागणी केलेली असून, श्री. दिपक रतन पिंगळे, नंदुरबार यांनी बांधकाम नकाशा मंजूरीच्या शुल्काची रक्कम नजरचुकीने मंडळाकडे भरणा केलेल्या रकमेच्या परताव्याची मागणी केलेली आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे:

| अनु. क्र. | प्राधिकरण/संस्था/व्यक्तिचे नाव | उपकर परताव्याचे कारण | उपकर परताव्याच्या मागणीची रक्कम (रुपयात) |
|---|---|---|---|
| १. | कोल्हापूर महानगरपालिका (श्री. दत्ताबाळ मिशन डिव्हाइन, कोल्हापूर.) | महापालिकेकडून बांधकाम परवानगी रद्य करण्यात आल्यामुळेश्री. दत्ताबाळ मिशन डिव्हाइन, कोल्हापूर यांनी मंडळाकडे भरणा केलेल्या उपकराच्या परताव्याची मागणी. | ६३,९१०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्री. दिपक रतन पिंगळे, नंदुरबार | बांधकाम नकाशा मंजूरीच्या शुल्काची रक्कम नजरचुकीने मंडळाच्या उपकर खात्यात जमा करण्यात आली. सदर रक्कम परताव्याची मागणी. | १५,६५५/- |
| | **एकूण** | | **७९,५६५/-** |

वरील तपशीलाची संबंधित व्यक्तिंकडून मंडळाकडे भरणा केलेली रक्कम रु. **७९,५६५/-** परताव्यांची प्रकरणे मंडळाच्या मान्यतेसाठी सादर.

मंडळ मान्यतेनंतर सदर परताव्याची प्रकरणे संबंधित क्षेत्रिय कार्यालयांकडे पडताळणीसाठी पाठविण्यात येतील. पडताळणीचा अहवाल व शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या परताव्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव क्र.४७(१२)/२०१८: मंडळाच्या दि. १६.०६.२०१८ च्या बैठकीतील ठरावानुसार उपकराच्या २ प्रकरणांचा परतावा करताना सदर प्रकरणे संबंधित जिल्हा कार्यालयांकडून छाननी करुन विभागीय कार्यालयामार्फत परताव्याच्या शिफारस प्राप्त झाल्यानंतर मंडळ स्तरावर छाननीअंती प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा. शासन मान्यतेनुसार मंडळ स्तरावरुन परताव्याची कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र.१३: मंडळाच्या मुख्यालयाकरीता भाडेतत्वावर जागा घेणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मंडळाचे मुख्यालय सद्य:स्थितीत कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, ई ब्लॉक, सी २०, वांद्रा-कुर्ला संकुल वांद्रे (पूर्व), मुंबई येथे कार्यरत आहे. सदर ठिकाणी उपलब्ध असलेली जागा अधिकाऱ्यांचे दालन व कर्मचारी यांच्याकरिता अपुरी पडत आहे. त्यामुळे मंडळाच्या मुख्यालयाकरिता स्वतंत्र जागा असणे आवश्यक आहे व त्यानुसार मंडळाच्या मुख्यालयासाठी भाडेतत्वावर जागा घेणेबाबतचा ठराव मंडळाच्या दि.१६.०६.२०१६ रोजीच्या बैठकीत पारित झालेला आहे.

दि.१५.०५.२०१७ रोजी मा. मंत्री महोदय (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली परिषद सभागृह, मंत्रालय येथे पार पडलेल्या बैठकीत मंडळाच्या मुख्यालयाकरिता जागेसंबंधी झालेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास विभागाकडे (MSSDS) मेकर चेंबर, दक्षिण मुंबई येथे १५००० चौ. फुट एवढी जागा उपलब्ध असून त्यामधून मंडळाच्या मागणीनुसार मुख्यालयाकरिता जागा उपलब्ध करुन देता येईल व मंडळास उपलब्ध देण्यात येणाऱ्या जागेच्या क्षेत्रफळानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रमाणित केलेल्या दरानुसार सदर जागेचे भाडे मंडळामार्फत अदा करण्यात येईल असे मा. मंत्री महोदय (कामगार) यानी निर्देशित केले होते.

त्या अनुषंगाने, मंडळाच्या मागणीनुसार अंदाजे ६१७० चौ. फुट एवढी जागा मेकर चेंबर, दक्षिण मुंबई येथे उपलब्ध करून देण्याबाबतचा मा. प्रधान सचिव (कामगार-७), उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, यांना दि.२५.०५.२०१७ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

दिनांक ०६.०६.२०१७ च्या मंडळ बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**मंडळाच्या मुख्यालयाकरिता कौशल्य विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडील जागेमधून भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन घेणेबाबतचा प्रस्ताव दिनांक २५.०५.२०१७ रोजी शासनास सादर केलेल्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

मंडळाच्या दि.२५.०५.२०१७ च्या पत्रान्वये मेकर चेंबर येथे जागा उपलब्ध करुन देण्याबाबत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने त्यांच्या दि. ०६.०९.२०१७ च्या पत्रान्वये सदर प्रस्ताव शासनाकडून कौशल्य विकास व उद्योजकता विभागाकडे सादर केला असता कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या अभिप्रायांच्या अनुषंगाने मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी **“महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या प्रशासकीय कार्यालयासाठी भाडेतत्वावर स्वतंत्र जागा घेण्यात यावी. जागा भाडयाने**

**घेण्यापूर्वी नियमानूसार विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करावा"** असे निर्देश दिलेले असल्याचे सुध्दा सदर पत्रात नमूद असून शासनाने मा. मंत्री महोदय (कामगार) यांच्या निर्देशानुसार उचित कार्यवाही करण्याबाबत सुचित केले आहे.

त्याप्रमाणे मंडळास प्रस्तावित केलेल्या ७००० चौ. फुट भाडयाच्या जागे करता दि.२३.१०.२०१७ रोजी ई-निवीदा प्रसिध्द करण्यात आली, सदर ई-निवीदा प्रक्रियेमध्ये ३ निवेदाकारानी सहभाग घेतला होता. तांत्रिक प्रक्रियेत १ निवेदाकाराला अपूर्ण कागद पत्रामुळे बाद करण्यात आले. उर्वरित २ निवेदाकारांनी प्रस्तावित केलेल्या फोर्ट व बॅलार्ड इस्टेट विभागातील दोन भाडयाच्या जागा मंडळाच्या उप समितीने पहाणी केली. सदर समितीने दोन्ही जागा मंडळाच्या उपयोगाकरीता योग्य नसल्याचे अभिप्राय दिले त्यामुळे सदर ई-निविदा रदद करणे प्रस्तावित आहे.

सद्यस्थितीत मंडळास प्राप्त झालेल्या कार्यालयासाठी भाडयाच्या जागेच्या प्रस्तावांचा तपशील खालील प्रमाणे

**Office Space for Rent -**

**Location- Hallmark Business Plaza, Opposite Guru Nanak Hospital, Bandra (East) Mumbai – 400051 for MBOCWW Board Head Office**

| # | Floor | Carpet Area (Sq. ft.) | Built-up Area (Sq. ft.) | Condition | Rent (in Rs. Lakhs) | Agreement Tenure | Lock-in & Notice Period | Parking |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2nd Floor | 4563 | 7529 | **Unfurnished** | **Rate:11.29L per month** Rs. 150/sq.ft. per month on Chargeable Area inclusive of common area | 60 months for licensee and licensor | **Lock in for Licensee** : 36 months (With a notice period of 6 months upon early termination | 3 Nos. **(Negotiable)** |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | maintenance, current property taxes and car parking charges **(Negotiable)** | | beyond the lock-in period) | |
| 2 | 8th Floor | 4575 | 8199 | **Furnished** | **Rate: 14.35Lper month** Rs. 175/Sq. ft. per month on Chargeable Area inclusive of common area maintenance, current property taxes and car parking charges **(Negotiable)** | 60 months for licensee and licensor | **Lock in for Licensee** : 36 months (With a notice period of 6 months upon early termination beyond the lock-in period) | 3 Nos. **(Negotiable)** |
| 3 | 11th Floor | 9989 | 16482 (Unit No. 1101, 1103, 1104) | **Furnished** | **Rate: 14.98Lper month** Rs. 150/Sq. ft. per month on Chargeable Area inclusive of common | 60 months for licensee and licensor | **Lock in for Licensee** : 36 months (With a notice period of 6 months upon early terminati | 3 Nos. **(Negotiable)** |

| | |
|---|---|
| area maintenance, current property taxes and car parking charges **(Negotiable)** | on beyond the lock-in period) |

मंडळाच्या कार्यालयासाठी प्रस्तावित भाडयाची जागा कामगार आयुक्त कार्यालयापासून साधारणत: १ कि.मी. अंतरावर आहे. सदर उपलब्ध जागांमधून मंडळाच्या मुख्यालयासाठी जागा भाडयाने घेणे प्रस्तावित आहे. सदर जागेची पाहणी करून वाटाघाटीअंती दरमहा भाडे ठरविण्यासाठी मंडळाची समिती गठीत करणे प्रस्तावित आहे. समितीच्या मान्यतेअंती शासन मान्यता प्राप्त करून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

यावर मा. मंत्री महोदय (कामगार) यांनी याबाबत मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी मंडळाच्या मुख्यालयाकरीता भाडेतत्वावर जागा घेण्यासाठी जागेची निवड करावी व एका महिन्याच्या आत जागा घेण्यात यावी, असे निर्देश दिले. त्यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव क्र.४७(१३)/२०१८: मंडळाने यापूर्वी राबविण्यात आलेली निविदा प्रक्रिया रदद करण्यात यावी. मंडळाच्या मुख्यालयाकरीता भाडेतत्वावर घ्यावयाची जागा व जागेचे ठिकाण निश्चित करण्यासाठी मंडळाच्या वतीने मा. अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. मा. अध्यक्ष यांनी आगामी ०१ महिन्याच्या आत योग्य जागेची निवड करावी. मा. अध्यक्ष यांनी निवड केलेल्या जागेचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा, शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र.१४: मंडळाच्या मुख्यालयाकरीता वाहन खरेदी करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मंडळाच्या दि. ३०.०७.२०१४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमधील मुद्दा क्र.७ अन्वये मंडळाचे कामकाज सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून मंडळाच्या अध्यक्षांसाठी १ वाहन (इनोव्हा) सचिवांसाठी १ वाहन (स्वीफट) मंडळाच्या मुख्यालयासाठी १ वाहन (इनोव्हा) व मंडळाच्या विभागीय कार्यालयासाठी ५ वाहने [स्वीफट डीझायर (डिझेल)] अशी एकूण ८ वाहने खरेदी करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला होता.

त्याअनुषंगाने मंडळाच्या दि.०७.०८.२०१४ रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त वाहन खरेदी बाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता त्यानुसार शासनाच्या दि.११.०८.२०१५ रोजीच्या पत्रान्वये शासन वित्त विभागाच्या दि. ०८.०५.२०१४ व ०४.०८.२०१४ मधील तरतुदीचे पालन करून मंडळाचे अध्यक्ष यांच्याकरिता १ वाहन आणि मंडळाच्या मुख्यालयाकरिता १ वाहन अशी २ वाहने खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

शासनाच्या उपरोक्त मान्यतेनुसार व वित्त विभाग शासन निर्णय दि.२१.०१.२०१७ मधील तरतुदीनुसार मंडळाचे अध्यक्ष यांना राज्यमंत्री पदाचा दर्जा प्राप्त झालेला असल्याने मंडळाच्या दि. २८.०२. २०१७ रोजीच्या बैठकीतील पारित ठरावानुसार रू.२० लक्ष च्या मर्यादेत दि.१७.०५.२०१७ रोजी टोयाटा कंपनीची इनोव्हा क्रीस्टा हे वाहन खरेदी करण्यात आलेले आहे. तसेच, मुख्यालयाकरीता दि. १८.०८.२०१७ रोजी होंडा अमेझ हे ०१ वाहन खरेदी करण्यात आलेले आहेपरंतु, सदर वाहन हे मंडळाच्या बैठका मंत्रालय, सह्याद्री राज्य अतिथी गृह किंवा मुख्यालया व्यतिरिक्त अन्य ठिकाणी होत असतात, त्यावेळी बैठकांसाठी लागणारे अभिलेख, फाईलस, प्रोजेक्टर, लॅपटॉप व इतर सहित्य तसेच मंडळाच्या इतर अधिकाऱ्यांसाठी अपुरे असल्यामुळे बैठकांच्या वेळी खाजगी वाहनाने प्रवास करावा लागतो व त्यासाठी प्रवास खर्चावर वारंवार खर्च होत आहे. त्यामुळे मंडळाच्या दि.३०/०७/२०१४ रोजीच्या बैठकीमधील ठरावानुसार मुख्यालयास १ वाहन (इनोव्हा) खरेदी करणे प्रस्तावित आहे.

तसेच, मंडळाकडुन बांधकाम कामगारांची विशेष नोंदणी मोहिम, मंडळाकडून बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या नियमित कल्याणकारी योजना याशिवाय अटल पेन्शन योजना, प्रधान मंत्री आवास योजना, नोंदित बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक वस्तुसंच पुरविणे मंडळाच्या एकात्मिक संगणकीकरणाची निविदा प्रक्रिया राबविणे व जिल्हा स्तरावर ४० कामगार कल्याण केंद्र (WFC) उभारणे इ. प्रस्तावित योजनांसाठी, आयोजित बैठकांसाठी व मंडळ बैठकांसाठी मंडळाचे सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रवास

करावा लागतो.यास्तव सदरहू योजनेचे प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासाठी १ स्वतंत्र वाहन खरेदी करणे गरजेचे आहे.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासाठी १ स्वतंत्र वाहन, मुख्यालयासाठी १ इनोव्हा वाहन खरेदी करण्यास व प्रस्तावित ०२ वाहन खरेदीवरील खर्चाचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे. मंडळाच्या मान्यतेअंती शासन मान्यता प्राप्त करून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव क्र.४७(१४)/२०१८: मंडळाच्या मुख्यालयासाठी स्वतंत्र कार्यालय स्थापन झाल्यानंतर मंडळाच्या मुख्यालयासाठी एक वाहन व मंडळाचे सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासाठी एक वाहन असे एकूण ०२ वाहने खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. स्वतंत्र कार्यालय स्थापनेनंतर सदर ०२ वाहने खरेदीबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा. शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.१५: मंडळाचे सरकारी कामगार अधिकारी यांच्या नागपूर-मुंबई- नागपूर या विमान प्रवास खर्चास मंजुरी देणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, मंडळाचे सरकारी कामगार अधिकारी श्री. श्रीकांत हरी चोभे, हे कामगार विभागाच्या १४ व्या सेवा प्रवेशोत्तर परिक्षेच्या पर्यवेक्षणासाठी मा. कामगार उप आयुक्त (प्रशासन) यांच्या दि. ०७.०५.२०१८ च्या ओदशानूसार नागपुर येथे असताना मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई यांचे दि.०२.०५.२०१८ रोजीचे आदेशान्वये अपील क्र. MHSICMU/२०१८/M/००१२१४ च्या अनुषंगाने विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांना लेखी खुलासा स्पष्टीकरणांसह दि.१७.०५.२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता सुनावणीकरिता हजर रहाण्याबाबत निर्देशित केले होते.

सदर सुनावणीचे आदेश हे सुनावणीच्या दिनांकाच्या एक दिवस पुर्वी दि.१६.०५.२०१८ रोजी कार्यालयास प्राप्त झाल्यामुळे त्यांना तातडीने सुनावणीस उपस्थित रहाण्याबाबत मंडळाचे सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्देशित केले होते. सदर सुनावणीस तातडीने अल्पकालावधीत मुंबई येथे हजर होणे आवश्यक असल्यामुळे त्यांनी दि.१७.०५.२०१८ रोजी नागपुर- मुंबई - नागपुर असा विमानाने प्रवास केलेला आहे. त्यांच्या प्रवासाचे देयक रक्कम रु. १४,४८६/- मंडळाच्या मान्यतेने सादर करण्यात आले होते.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव क्र.४७(१५)/२०१८: मंडळाचे सरकारी कामगार अधिकारी यांच्या नागपूर-मुंबई-नागपूर या विमान प्रवासावरील रू. १४,४८६/- एवढया खर्चास मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** |
| **कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

**विषय क्र.१६.मा. सर्वोच्च न्यायालयातील जनहित याचिकेच्या अनुषंगाने दाखल करावयाचे प्रतिज्ञापत्र / शपथपत्र याकरीता विधी सल्लागार यांची नियुक्ती करणेबाबत तसेच त्यांच्या फी व त्यांच्या प्रवास व इतर भत्ता मंजूर करणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम १९९६ , इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर नियम १९९६ व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार नियम २००७, च्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यात इमारत व इतर बांधकाम कामाच्या ठिकाणी सदर कायद्याची अंमलबजावणी करण्यात येत असून अंमलबजावणी करतेवेळी आस्थापना , ठेकेदार, तसेच सदर कायदयान्वये स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत नोंदीत होणा-या बांधकाम कामगारांद्वारे (योजनेसंबंधी) मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या जात आहेत. सदर याचिके अंतर्गत मा. प्रधान सचिव (कामगार), मा. कामगार आयुक्त, महाराष्ट राज्य, मा. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म.इ.व.इ.बां.का.क., मुंबई, संबंधीत जिल्हयाचे सहाय्यक कामगार आयुक्त यांना प्रतिवादी म्हणून यांचे विरूध्द याचिका दाखल करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने उक्त नमूद अधिकारी / पदाधिकारी यांना न्यायालयात त्या विषयी प्रतिज्ञापत्र / शपथपत्र दाखल करून आपली बाजू मांडणे अभिप्रेत आहे.

श्री मोहम्म्द युनूस व इतर यांनी संघ भारत व इतर यांचे विरूध्द मा. सर्वोच्च न्यायालयात सिव्हील रिट पिटीशन क्र.२३९ / २०१८ दाखल केले असून, त्यांनी कथन केल्यानुसार त्यांचेकडून कामगार विभाग, उत्तर प्रदेश राज्याने याचिकाकर्त्यांनी त्यांनी केलेल्या बांधकामाच्या मूल्यावर १% उपकर वसूल करण्याकरीता बजावलेल्या नोटीसीच्या अनुषंगाने याचिकाकर्त्यांनी सदर याचिका दाखल केली आहे. या रिट पिटीशनच्या अनुषंगाने याचिकाकर्ता यांनी खालील प्रमाणे मागणी केली आहे.

१) प्रतिसादक यांना योग्य ते आदेश, मार्गदर्शक निर्देश देण्यात यावेत.
२) प्रतिसादक यांनी चूकीचा असलेला कायद्याअंतर्गत योग्य नियम करण्याबाबत योग्य ते आदेश, मार्गदर्शक निदेश देण्यात यावेत.
३) चूकीचा असलेल्या कायद्याअंतर्गत बदल घडवून येईपर्यंत उपकर वसूलीच्या कार्यवाहीस स्थगीती देण्यात यावी.
४) या संबंधी इतर किंवा पुढील निर्णय पारित करणे जो योग्य आहे समजण्यात येईल.

त्या अनुषंगाने उक्त विषयी सहाय्यक निबंधक मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी दिनांक २२/०५/२०१८ रोजीच्या पत्रान्वये रिट पिटीशन (सिव्हील) क्र.२३९/२०१८ मधील अनुक्रमांक १६ चे प्रतिसादक यांनी अथवा त्यांच्या वतीने विधी सल्लागार (मार्फत) शपथपत्र दाखल करण्याबाबत कळविले आहे. त्या अनुषंगाने उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे पत्र क्रमांक: याचिका -२०१८/ प्र. क्र.१०७/काम — ७; दि. १५ जून २०१८ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने रिट याचिका क्र.२३९/२०१८ ची प्रत मंडळ कार्यालयास प्राप्त झालेली असुन, उक्त नमूद रिट याचिकेसंबंधी शपथपत्र व आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात आले असल्याचे कळविले आहे. करीता, मंडळाची बाजू मा. सर्वोच्च न्यायालयात मांडण्याकरीता ॲड. श्री गिरीष शुक्ला यांना दिनांक २७/०६/२०१८ रोजीच्या पत्रान्वये प्राधिकृत करण्यात आले होते व ते दिनांक ०२/०७/२०१८ रोजी सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे वतीने मा. सर्वोच्च न्यायालयात सुनावणीकरीता हजर होते. सदर सुनावणी करीता हजर राहण्याकरीता ॲड. श्री गिरीष शुक्ला यांना द्यावयाचे मानधन व त्या निमित्त करण्यात येणारा प्रवास, निवास व इतर देय भत्तेबाबत त्यांनी दिनांक २९/०६/२०१८ रोजीच्या ई मेलद्वारे मंडळ कार्यालयास कळविले आहे. त्याबाबतची माहिती खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विवरण | आकारण्यात येणारे शुल्क |
|---|---|---|
| १ | केस हॅण्डलिंग प्रोफेशनल फी (मा.सर्वोच्च न्यायालयाकरीता)— ड्राफटींग व फाईलिंग सह | ₹ १,००,००० |
| २ | मा.सर्वोच्च न्यायालयात येण्या - जाण्याकरीता प्रत्येक भेटीकरीता प्रवास ,निवास व इतर भत्ता | ₹ २०,००० |
| ३ | मा. सर्वोच्च न्यायालयात ॲडव्होकेट ऑन रेकॉर्ड यांनी मागणी केलेली फी | ₹ २५,००० |

तसेच, आजतागयात दाखल करण्यात आलेल्या रिट याचिका / अवमान याचिका याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र. | याचिका क्रमांक | न्यायालय / याचिकाकर्ता व प्रतिसादक | जिल्हा | याचिकर्ता यांचेद्वारे करण्यात आलेली मागणी |
|---|---|---|---|---|
| १ | २३९/२०१८ | मा. सर्वोच्च न्यायालय<br>मो. युनूस व इतर विरूध्द<br>संघ भारत व इतर | नवी दिल्ली | • प्रतिसादक यांना योग्य ते आदेश, मार्गदर्शक निर्देश देण्यात यावेत.<br>• प्रतिसादक यांनी चूकीचा असलेला कायद्याअंतर्गत योग्य नियम करण्याबाबत योग्य ते आदेश, मार्गदर्शक निदेश देण्यात यावेत.<br>• चूकीचा असलेल्या कायद्याअंतर्गत बदल घडवून येईपर्यंत उपकर वसूलीच्या कार्यवाहीस स्थगीती देण्यात यावी.<br>• या संबंधी इतर किंवा पुढील निर्णय पारित करणे जेणे तो योग्य आहे असे समजण्यात येईल . |
| २ | ९४९६ /२०१७ | मा.उच्च न्यायालय,मुंबई<br><br>जनरल कामगार युनियन, सोलापूर.<br><br>विरूध्द<br><br>मा. प्रधान सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, | सोलापूर | • वैद्यकीय लाभ , शिष्यवृत्ती अर्थसहाय्य, अंत्यविधी अर्थसहाय्य, पेन्शन व मृत कामगाराच्या कायदेशीर वारसास दाव्याबाबतची रक्कम अदा करण्याबाबतचे निर्देश द्यावे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मा. कामगार आयुक्त.<br>सहाय्यक कामगार आयुक्त, सोलापूर | | |
| ३ | ११९७०/२०१७ | मा.उच्च न्यायालय,मुंबई<br><br>श्रीम. उल्का पांडुरंग कांबळे व इतर १७ विरूध्द<br><br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई<br><br>महाराष्ट्र राज्य द्वारा, कामगार आयुक्त, मुंबई<br><br>सहाय्यक कामगार आयुक्त, सांगली<br><br>सहाय्यक कामगार आयुक्त, कोल्हापूर | सांगली | • कामगाराच्या मृत्यू नंतर त्यांचे कायदेशीर वारसास देय असलेल्या अंत्यविधी अर्थसहाय्य रक्कम रू.५०००/- व दरमहा रू.१०००/- प्रमाणे पाच वर्षाकरीता अर्थसहाय्य व मृत कामगाराच्या वारसास रक्कम रू.२,००,०००/- अर्थसहाय्य योजनेंतर्गत लाभाचे वाटप केलेले नाही व सदर लाभ मिळवून देणेकरीता असमर्थता दर्शविलेली आहे.<br>• मृत कामगारांच्या कायदेशीर वारसास देण्यात येणारे आर्थिक सहाय्य हे मोटार वाहन नियम, १९८८ अंतर्गत देण्यात येणाऱ्या नुकसानभरपाई नुसार देण्यात यावे, अशी तरतूद करण्यात यावी |
| ४ | १३६५१/२०१७ (मूळ याचिका ११६८३/२०१६) | मा.उच्च न्यायालय,मुंबई<br><br>जनरल कामगार युनियन, सोलापूर<br><br>विरूध्द | सोलापूर | • मूळ याचिका क्र.११६८३/२०१६ च्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी सदर प्रकरणी दि.२४.१०.२०१६ रोजी निकाल पारित करून ०८ आठवडयात निर्णय |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मा. प्रधान सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग,मंत्रालय मुंबई ३२<br><br>मा. कामगार आयुक्त,मुंबई<br><br>सहाय्यक कामगार आयुक्त, सोलापूर | | घेऊन व त्यावर अंमलबजावणी करण्याचे आदेश शासनास दिलेले असता. मंडळाने दि.२३.०३.२०१७ रोजीच्या पत्रान्वये आपले अभिप्राय कळविले होते. सदर अभिप्रायास उडवाउडवीचे उत्तर दिल्याबाबतचे गृहीत धरून जनरल कामगार युनियन संघटनेमार्फत अवमान याचिका क्र. १३६५१/ २०१७ दाखल करण्यात आली आहे. |
| ५ | १११७२/२०१६ | मा.उच्च न्यायालय,मुंबई श्री. संतोष प्रकाश तेली व इतर ११<br><br>विरूध्द<br><br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई<br><br>सहाय्यक कामगार आयुक्त, सांगली<br><br>सहाय्यक कामगार आयुक्त, कोल्हापूर | सिंधुदुर्ग | • ग्रामीण भागात घरबांधणीचा अंदाजे खर्च रक्कम रू.१०.०० लाख येतो. म्हाडाची याबाबतची आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी माफक दरात घर उपलब्धतेची योजना राबविली जाते. सदर योजना अंतर्गत मंडळातील नोंदीत कामगारांचा समावेश करण्यात येऊन सदर EWS योजनेंतर्गत लाभार्थीना या योजनेशी जोडून घरबांधणी योजनेचा लाभ रक्कम रू.१०.०० लाख करण्यात यावा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | सरकारी कामगार अधिकारी, सिंधुदुर्ग | | |

करीता, उक्त नमूद जिल्हयातून मा उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेसंबंधी विधी सल्लागार यांची नियुक्ती व दाखल करावयाचे प्रतिज्ञापत्र / शपथपत्र यासंबंधी होणारा खर्च तसेच, भविष्यातील मा. सर्वोच्च न्यायालयात, मा. उच्च न्यायालयात दाखल होणा-या याचिकेच्या अनुषंगाने शासन / मंडळाच्या वतीने न्यायालयात बाजू मांडण्याकरीता विधी सल्लागार यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

त्या करीता, सदर सेवा पुरविणा-या २ ते ३ विधी सल्लागार यांनी मंडळाची बाजू मा.न्यायालयात मांडण्याकरीता तसेचप्रतिज्ञापत्र/ शपथपत्र ( ड्राफटींग व फाईलिंग सह ) या बाबत दर मागविण्यात येउन न्युनतम दर सादर करणा-या विधी सल्लागार यांची नियुक्ती करणे ( त्यांनी याचिकेच्या अनुषंगाने मा.न्यायालयात सादर करावयाच्या प्रतिज्ञापत्र/ शपथपत्र ड्राफटींग व फाईलिंग सह मंडळास सादर करण्यात येणा-या प्रति याचिकेप्रमाणे आकारण्यात येणारे शुल्क सह ), न्यायालयात येण्या-जाण्याकरीता लागणारा प्रवास भत्ता, निवास भत्ता (मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्लीच्या बाबतीत ) व इतर भत्ते च्या खर्चास मंजूरी चा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव क्र.४७(१६)/२०१८: मा. सर्वोच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र.२३९/२०१८ मध्ये मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना प्रतिवादी करण्यात आलेले आहे. सदर रिट याचिकेसंबंधी शपथपत्र व आवश्यक कागदपत्र सादर करण्यासाठी शासन स्तरावरून सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे. या अनुषंगाने, दाखल करावयाचे प्रतिज्ञापत्र / शपथपत्र याकरीता ॲड. श्री. गिरीश शुक्ला यांच्या नियुक्तीस व केस हँडलिंग प्रोफेशनल फी- रू.१,००,०००/-, मा. सर्वोच्च न्यायालयात येण्या जाण्याकरीता प्रत्येक भेटीकरीता प्रवास, निवास व इतर भत्ता करीता रू.२०,०००/- व मा. सर्वोच्च न्यायालयात ॲडव्होकेट ऑन रेकॉर्ड यांना अदा करावयाची रक्कम रू.२५,०००/- एवढया खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. याशिवाय शासन/मंडळाच्या विरूध्द मा. सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयात दाखल ०५ रिट याचिका/ अवमान याचिकेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीसाठी वकीलाची नियुक्ती करण्यास व अपेक्षित खर्चासही मान्यता प्रदान करण्यात येत आहे तसेच, मंडळाच्या**

**कामकाजाच्या अनुषंगाने भविष्यात मा. सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालयात दाखल होणाऱ्या याचिका / रिट याचिका च्या अनुषंगाने मंडळाने करावयाच्या न्यायालयीन कार्यवाहीकरीता (परिच्छेदनिहाय शपथपत्र तयार करणे, न्यायालयात सादर करणे, सुनावणीच्या वेळी हजर राहणे इत्यादी कामाकरीता) दरपत्रके मागवून ०२ वकीलांची पॅनेल नियुक्त करण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

| | |
|---|---|
| **सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी** | **अध्यक्ष** |
| **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** | **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार** |
| **कल्याणकारी मंडळ, मुंबई** | **कल्याणकारी मंडळ, मुंबई** |

सर्व विषयांवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर मंडळ सचिव यांनी मंडळाचे मा. मंत्री महोदय (कामगार), मा. अध्यक्ष, मंडळ सदस्य व सर्व उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहिर केले.

*****************